म. ग्रं. सं. ठाणें

विषय

चरित्र

संग्रहालय क्रमांक

३४८

लेखक अण्णाजी गोपाळ मुजुमदार

सन

१८८३

पुस्तकाचें नांव करसनदास - मुळजी चरित्र

४४८

ग्र. सं. ठाणे

~~स्वर्गवासी~~ —

# सनदास मुळजी
## यांचें संक्षिप्त चरित्र

गुजराथी ग्रंथाच्या आधारें

अण्णाजी गोपाळ मुजूमदार

यांनीं लिहिलें

॥ दोहरा ॥

॥ जब तुम पैदा भये ॥ जगहांसे तुम रोय ॥
॥ अब तोभी ऐसा करो ॥ के पीछे न हांसे कोय ॥

तुळशीदास.

मुंबई :

सुबोधप्रकाश छापखान्यांत छापिलें.

सन १८९३.

किंमत दीड आणा.

ते कोठच्या कोना कोपऱ्यांत निवर्तले, हें कोणाच्या काना-च्या कोपऱ्यास सुद्धां कळलें नाहीं. मग वर्तमानपत्रांत 'लोक कल्याणकारी पुरुष' या सदराखालीं त्यांचें नांव कसें येईल, व जग त्याची आठवण तरी कशाला काढील?

---

# प्रस्तावना.

गुजराथींत स्वदेशवत्सल नांवाचें मासिक पुस्तक आहे. त्याच्या कर्त्यानें प्रस्तुत नायकाचें संक्षिप्त चरित्र लिहिलेलें आमच्या वाचण्यांत आलें. आह्मांस करसनदास मुळजी या नांवाची ओळख फक्त त्यांच्या सुप्रसिद्ध इंग्लडच्या प्रवासग्रंथाव-रून झालेली. हे गृहस्थ ह्मणजे अधुनिक सुधारक ह्मणविणारांत अग्रेसर असून देशहितार्थ कायावाचामनें झटणाऱ्यांपैकीं होते, हें आह्मांस ठाऊक नव्हतें. सांप्रत वर्तमानपत्रांचा जितका प्रसार झाला आहे, व निरनिराळ्या प्रांतांतलि लोकांचें जितकें एकमेकांशीं दळणवळण पडलें आहे, तितकें पंचवीस तीस वर्षां पूर्वीं नव्हतें. व प्रांतोप्रांतीची ठळक मंडळी एकमे-कांच्या दाट परिचयांतील नव्हती. त्यामुळें कित्येक पराक्रमी, देशाभिमानी व देशकल्याणकर्त्या थोर पण परस्थ जनांची महाराष्ट्रीयांस ओळख नव्हती. विशेष संघट्टणाशिवाय कोणी कोणास फारसें ओळखीत नाहींत, हें खरें आहे. पण लोक कल्याणकर्त्या जनांच्या गुणांचा परिमळ चोहोंकडे पसरल्या-शिवाय राहत नाहीं. जार्ज वाशिंग्टन, कोलंबस, लूथर, इत्या-दि थोर पुरुषांचीं चरित्रें आपणांस कशीं माहीत झालीं? जरी ह्या महाशयांचीं आह्मांस इंग्रेजांनीं ओळख करून दिली, तरी तसें करण्यास मुळ कारण त्यांचे गुणच होते. त्यांचीं नांवें नि-

नीं आमच्या चुका वर्तमान पत्रद्वारें आमच्या नजरेस आणून दिल्यास आह्मांवर त्यांचे फार फार उपकार होतील, कारण आह्मांस पुढील प्रयत्नांत त्यांबद्दल जपतां येईल.

ग्रंथकर्ता.

तारीख ११ नोव्हेंबर १८९२.

---

मराठी ग्रंथ संग्रहालय

# शेट करसनदास मुळजी यांचें संक्षिप्त चरित्र.

सर्व जगाला आपण पाहूं शकतों, परंतु आपलें रूप आपणास दिसत नाहीं. तें दिसण्यांस आरशा सारख्या साधनांची गरज लागते. आरशांत आपलें बाह्यस्वरूप मात्र दिसून येतें, परंतु आपलें अंतरंग नीट नेटकें आहे, किंवा नाहीं, ह्मणजे आपल्या ठायीं जे गूण अवश्य असले पाहिजेत, ते आहेत, किंवा नाहींत, असल्यास कितपत व कसे आहेत, व नसल्यास ते कसे आणतां येतील, इत्यादि समजण्यासाठीं थोर पुरुषांच्या चरित्ररूपी आरशांची गरज आहे. ज्या थोर पुरुषांची कीर्ति सारें जग गात आहे, हेच केवळ आपलें अंतरंग ओळखून काढण्यास व तें नीट नेटकें करण्यास आरसे होत. या आरशांत पाहतांना ह्मणजे हीं चरित्रें वाचतांना आपले गुणदोष आपणांस दिसूं लागतात, आणि आपल्याठायीं धाडस, पराक्रम, सत्यप्रियता, दया इत्यादि झांकलेले गूण असल्यास ते प्रस्फुरण पावूं लागतात. निजलेल्या मनुष्याच्या हातून जसें कांहीं काम होत नाहीं, तसे झांकलेले गूण मनुष्याच्या कांहीं उपयोगी पडत नाहींत. महाभारतांतील योध्यांचें शौर्य

जर शिवाजी महाराजास कळलें नसतें, तर त्यांच्या आंगचा प्रताप कधींही जगाच्या दृष्टीस पडला नसता. महाभारत, भागवत, रामायणादि ग्रंथ जर नसते, तर आमचे ज्ञानोबा, तुकोबा, तुळशीदास, कबीर, चैतन्य, रामदास समर्थ इत्यादि संतमालिका निर्माण होण्याची आशा नव्हती. तात्पर्य काय, कीं, महापुरुषांच्या चरित्रवाचनानें वाचकांस स्फूर्ती होऊन ते महत्कार्यें करण्यास कंबर बांधतात. त्या महा पुरुषांवर प्रसंग कसकसे आले, त्या वेळीं त्यांनीं आपल्या मनाची समता कशी ठेविली, धैर्य कसें दाखविलें, त्या प्रसंगांशीं त्यांनीं कशी टक्कर दिली, त्यांस काय काय मसलती योजाव्या लागल्या, इत्यादि गोष्टी समजून घेऊन वाचणाऱ्याचें ज्ञान वाढतें.

सांप्रत आपल्या देशांत व विशेषतः या मुंबई इलाख्यांत जे कोणी समाजाचे अग्रेसर झाले, व ज्यांनीं आपल्या वर्तनानें खरी सुधारणा ह्मणजे काय, हें लोकांस दाखविलें, अशांच्या पंक्तींत श्रेष्ठस्थानीं बसलेले शेट करसनदास मुळजी हे होत. यांचें चरित्र संक्षेपानें येथें देतों.

करसनदास हे जातीचे कपोलवाणी होते. यांचा जन्म मुंबई मुकामीं सन १८३२ च्या जुलाई महिन्याच्या पंचविसाव्या तारखेस झाला. कोणी ह्मणतात कीं, काठेवाडांत भावनगर संस्थानांतील महुवा गांवाशेजारीं वडाळ नांवाचें

खेडें आहे, जेथें ह्यांच्या घराण्याची मूळ वस्ती, त्या ठिकाणीं यांचा जन्म झाला. तें कसेंही असो, पण इतकें खचित समजतें कीं, ह्यांचें घराणें कुलीन होतें. मुंबईचे प्रसिद्ध नवलाखी शेट मोदी नागरदास हिरजी यांच्या कुलीन घराण्याशीं यांचा संबंध होता, व ह्यांच्या आजोळचें घराणेंही कुलीनच होतें. करसनदास लहान असतांनाच त्यांची आई वारली; तेव्हां आजोळच्या संबंधानें त्यांस चुलत आजीनें वाढविलें. त्यांच्या लहानापणाच्या कांहीं गोष्टी लिहून ठेवण्यासारख्या ऐकण्यांत नाहींत. लहानपणींच आजीनें त्यांस शाळेंत घातलें होतें. शिवाय इतकें मात्र समजतें कीं, ते आपल्या वयाच्या एकविसाव्या वर्षीं एलफोन्स्टन पाठशाळेंत इंग्रजी शिकत होते.

हल्लीं ज्याप्रमाणें इंग्रजी शिकण्याची आप्पलपोटी पद्धत आहे त्याप्रमाणें त्यावेळीं नव्हती. जें ज्ञान आपण इंग्रेजी भाषेच्याद्वारें शिकावें, ते स्वभाषेच्याद्वारें आपल्या देशबंधूंस अवगत करून देण्याचा प्रघात त्यावेळीं होता. त्यावेळीं मुंबईस ज्ञानप्रसारक नांवाची एक मंडळी होती; त्यामंडळीपुढें दर आठवड्यास कोणीतरी निबंध वाचावा, आणि त्यावर इतरांचीं भाषणें व वादविवाद व्हावा, असा संप्रदाय होता. त्या मंडळीपुढें शेट नवरोजी फरदुनजी, दादाभाई नवरोजी, डाक्टर भाऊ दाजी इत्यादि विद्वान गृहस्थ अनेक विष-

यांवर निबंध रचून वाचीत असत. त्याप्रमाणें करसनदास यांनींही स्वतः निबंध लिहून वाचलेले आहेत. ज्ञानप्रसारक सभेची एक शाखा "बुद्धिवर्धक" या नांवानें सन १८५१ नांत स्थापन झाली. या सभेचे करसनदास सभासद होते. सन १८९३ नांत ज्ञानप्रसारक सभेकडून 'बालविधवांची दुःस्थिति व ती सुधारण्याचे उपाय' या विषयावर उत्तम निबंध लिहिणारांस दीडशें रुपयांचें बक्षीस देण्याचा ठराव बाहेर पडला. हा निबंध आपणही ल्याहावा, अशी इच्छा करसनदास यांच्या मनांत उद्भवली, आणि त्याप्रमाणें त्यांनीं तो लिहिण्यास आरंभ केला. कित्येक बंद लिहून तयार होते, व पुढें लिहिण्याचें काम चाललेंच होतें, दरम्यान ते बंद कोणाएकाच्या नजरेस पडल्यावरून त्यानें करसनदास यांच्या आजीस ही गोष्ट कळविली. तेणेंकरून त्या ह्मातारीस अतिशय वाईट वाटून तिच्या आंगाचा संताप होऊन गेला. तिला वाटलें कीं, पोर बिघडलें; तिनें करसनदास यांस बोलबोलून पुरेपुरेसें केलें. ती त्यांस ह्मणे कीं 'तू असें वेडेंविद्रें लिहूं नको'. तिची समजूत याप्रमाणें होती, यांत मोठेंसें नवल नाहीं. त्यावेळीं लोकांच्या मनाची अशी स्थिति होती कीं, कोणी स्त्रीपुनर्विवाहाचें नांव काढलें कीं पुरे; त्याला सर्वांनीं नाना प्रकारची भीति दाखवून घाबरें करून सोडावें. को-

णी खून केला तरी लोकांच्या मनाला इतका त्रास वाटत नव्हता, परंतु नुसता स्त्रीपुनर्विवाह या शब्दाचा उच्चार केल्याबरोबर लोकांनीं गहजब करून सोडावा! करसनदासाच्या आणि आजीच्या विचारांत जमीन अस्माना-इतकें अंतर. ते तीस सांगत कीं, नुसत्या लिहिण्यानें मी सुधारलों अथवा बाटलों, असें होत नाहीं; परंतु तें त्यांचें सांगणें ह्मातारीस रुचेना; तिचा आणि त्यांचा एवढ्यावरूनच तंटा झाला, व त्यामुळें त्यांस आजीपासून वेगळें रहावें लागलें; हा मात्र त्यांत शेवट झाला.

वेगळें राहूं लागल्यावर पोटाची पंचाईत पुढें उभी राहिली. त्यांची मातोश्री वारल्यावर त्यांच्या वडिलांनीं द्वितीय संबंध केला होता, तशांत लहानपणापासून आजोळीं राहिल्यानें आतां मोठ्या वयांत बापाच्या व सावत्र आईच्या आश्रयास जाणें, हें बरोबर नाहीं, ह्मणून स्वतंत्रच राहूं लागले. बाणेदार व हिम्मतदार मनुष्य असला ह्मणजे त्याला मोठेपणास चढविण्यास विपत्तीच कारण होते. तो विपत्तींत न घाबरतां तिशीं सामना करून टक्कर देऊन राहतो. गुणोत्कर्ष होण्यास प्रसंगच पाहिजेत. करसनदास यांनीं आतां अभ्यासावर जास्त मेहनत घेऊन स्कालरशिप (पगारी विद्यार्थ्याची जागा) मिळविली. आणि त्यावेळीं त्यांचा जरी शाळेंतील अभ्यास चालला

होता, तरी त्यांचें इतर ज्ञानार्जन बंद पडलें होतें असें नाहीं. सन १८५३ सालांत बुद्धिवर्धक सभेंत त्यांनीं देशाटनावर निबंध वाचला. त्यावेळीं सभेंत पुष्कळ विद्वान व थोर लोक हजर होते 'निबंध फार उत्कृष्ट उतरला' असें सर्वांनीं सांगितलें; त्यामुळें ह्यांच्या कित्येक स्नेह्यांनीं तो छापविला; व तेंव्हांपासून करसनदास यांचा लिहिण्याचा उत्साह व उत्कंठा वाढली; व ती तशीच पुढें आमरण कायम राहिली.

याच सुमारास मांडवी बंदरावरील श्रीमान शेट गोकूळदास तेजपाळ यांच्या शाळेंतील मुख्य गुरूच्या जागीं करसनदास यांची नेमणूक झाली. त्यामुळें उपजीविकेचा घोर नाहींसा झाला. आणि त्यांचें लक्ष देशहितवृद्धिकडे सर्वथैव लागलें. त्यावेळीं बुद्धिवर्धक सभेच्या नांवानें मोठ मोठीं कामें करण्यासाठीं कित्येकांनीं कंबरा बांधून मुलांच्या आणि मुलींच्या शाळा स्थापिल्या. पुस्तकालयें आणि शिल्पविद्यालयें स्थापण्याच्या वाटाघाटी सुरू होऊन सभेंतून व्याख्यानें होऊं लागलीं. या सर्व कृत्यांत करसनदास यांचें थोडें बहूत अंग होतेंच शिवाय त्यांनीं प्रथम रास्तगोफ्तार वर्तमानपत्राशीं संबंध ठेवून ते आपल्या लोकांच्या सामाजिक स्थितीवर लेख लिहूं लागले होते. हे लेख लिहितांना त्यांस फार जपावें लागे; कारण

जुन्या लोकांचीं सुधारणेविषयीं दुर्मतें खोडून नवे लोक तिच्या भपक्यानें मोह पावून बहकून न जातां योग्य पंथानें चालतील, अशा दोन्ही गोष्टींकडे लक्ष देऊन ल्याहावें लगे. पुढें कांहींकां दिवसांनीं करसनदास यांनीं स्वतः एक प्रत्याहिक वर्तमानपत्र काढण्याचा निश्चय करून सन १८५८ नांत ‘ सत्यप्रकाश ’ या नांवाचें पत्र सुरू केलें. व या कामीं पैशासंबंधीं सर्व मदत नामदार सर मंगळदास नथुभाई या थोर गृहस्थांनीं दिली.

असो, एकदां असें झालें कीं, वैष्णवधर्मी वाणीलोक ज्याप्रमाणें कृष्णमूर्तीस नानातऱ्हेचें ( छपन्न ) भोग करीत असतात, त्याप्रमाणें ब्राह्मणांनीं भुलेश्वर महादेवास छपन्न भोग केले. ‘विष्णुनिर्माल्याचा ज्याप्रमाणें उपयोग होतो, त्याप्रमाणें शिवनिर्माल्याचा होत नाहीं; असें असून शिवनिर्माल्य शास्त्राविरुद्ध ब्राह्मणांनीं उपयोगांत आणला, अशी तक्रार वैष्णवांनीं उठविल्यावरून शैव आणि वैष्णव पंथांच्या लोकांत मोठा वाद माजला. ही संधी पाहून करसनदास हे सत्य प्रकाशांतून दोन्ही पंथांच्या अनीतीच्या व वेडगळ चाली प्रकट करूं लागले. त्यांचें लिहिणें मोठें मार्मिक असे. शिवाय त्यांस शेट मथुरादास लवजी व लखमीदास खिमजी हे अनुकूल झाले होते. मग काय विचारावें? आपल्या धर्माचें रहस्य लोकांत प्र-

गट होऊ नये, व करसनदास यांणीं त्यांच्या धर्माविरुद्ध सत्य प्रकाशांतून लेख लिहिण्याचें बंद करावें एवढ्या करितां वैष्णवधर्मी वाणीलोकांनीं करसनदासजी यांस दहा हजार सुर्ती रोकड देऊं केले. परंतु करसनदास यांनीं सत्याची कांस धरून ही भेट (?) उर्फ लांच न अंगिकारितां देणारांचा तिरस्कार व निर्भत्सना केली! धन्य आहे त्यांच्या छातीची!! त्यांनीं असा विचार केला कीं, हे दहा हजार रुपये घेऊन सत्यापलाप करणें, हें महापाप आहे शिवाय, या दहा हजारांनीं माझ्या एकट्याचा फायदा होणार, परंतु माझ्या लेखांनीं धर्मांतील अनीतीचा प्रकार बाहेर पडून त्यापासून जो हजारों लोकांस फायदा होत असेल, व पुढें होईल, तो बंद पडेल. यास्तव लांच न घेणें हे श्रेयस्कर होय. पोक्त विचार तो यालाच ह्मणतात. अशा विचारी लोकांची आपल्या देशांत समृद्धि कधीं होईल?

सन १८५६।५७ इसवी सालांत मेहेरबान होप साहेब बाहादूर यांनीं करसनदास यांची आपल्या कामांत हुशारी पाहून त्यांस डीसा येथील इंग्रेजी शाळेचे मुख्य गुरु नेमिलें; यामुळें त्यांस मुंबई सोडावी लागली. सत्यप्रकाश चालविण्यांचें काम महिंपतराम रुपराम यांनीं संभा·

---

१ हे गृहस्थ अमदाबादेस ट्रेनिंग कालेजाचे प्रिन्सीपाल होते त्यांस सरकारांनीं सी. आय. ई ही पदवी त्यांच्या गुणावरून दिली होती.

ळिलें; परंतु कांहीं दिवसांनीं त्यांचेंही अमदाबादेस जाण्याचें ठरल्यानें तें काम त्यांनीं जव्हेरलाल उमियाशंकर यांस सोपलें करसनदास डिशास जाण्यास निघाले, त्यावेळीं बुद्धिवर्धक सभेनें त्यांस मानपत्र दिलें. यावरून लोकांत त्यांची मानप्रतिष्ठा कशी होती, हें उघड दिसून येतें. डिसा येथें सुमारें दहा महिने घालविल्यावर त्यांची प्रकृती बिघडली. त्यांस तेथील हवापाणी मानवत नाहींसें दिसलें. त्यांनीं डाक्टरापाशीं सर्टिफिकेट मागितलें. पण त्या तऱ्हेवाईक डाक्टरानें तें न दिल्यामुळें हल्लींच्या रितीप्रमाणें कोणाचा वशिला लावावा, अथवा डाक्टरांस लांच द्यावा, असल्या हलकट प्रयत्नांत न पडतां एकदम नोकरीवर लाथ मारून मुंबईस निघून आले; आणि पुनः सत्यप्रकाशाचे आधिपत्य स्विकारलें. करसनदास यांनीं डिशाससारे दहाच महिने घालविले खरे, पण तितक्याच अवकाशांत तेथील लोकांस त्यांनीं आपलेंसें करून टाकलें. तेथें एक सभा स्थापन केली, आणि 'नीतिबोध' नांवाचें वर्तमानपत्र सुरू केलें.

या सुमारास करसनदासांचें द्वितीय कुटुंब निवर्तलें;

---

१ हा महात्मा कोणास ठाऊक नाहीं, असें नाहीं. हें सरकारच्या कायदे कौन्सिलचे मेंबर होते, जस्टीस आफदी पीस आहेत, मुंबई म्युनिसीपालटीच्या कारपोरेशनांत प्रमुख सभासद आहेत, युनिव्हर्सिटीचे फेलो आहेत, इत्यादि.

त्यामुळें मुंबईस आल्यावर तिसऱ्यांदा लग्न करावें लागलें. वधूच्या मांडवांत लग्नाकरितां वरानें घोड्यावर बसून मिरवत गेलें पाहिजे, असा संप्रदाय आहे, ( ह्या मिरवणुकीस गुजराथींत वरघोडा ह्मणतात ) परंतु करसनदास ह्मणाले कीं, एवढ्या मोठ्या वयांत घोड्यावर बसून जाणें शोभत नाहीं, यास्तव मी पायीं मिरवत जाईन. या त्यांच्या आग्रहावरून मंडळींत रुसण्या फुगण्याचा प्रकार झाला. हे आपलें ह्मणणें सोडीनात, आप्त व इतर जन आपला वरघोडा मिरविण्याचा आग्रह सोडीनात; याप्रमाणें भलतेंच विघ्न कार्यांत येऊं लागलें; पण सरतेशेवटीं कांहीं समजुतदार लोकांनीं मध्यें पडून उभयपक्षीं समाधान[१] केलें.

करसनदास सत्यप्रकाशपत्र चालवीत होते, पण तेवढ्यावर त्यांचा निर्वाह चालेना; ह्मणून कोटांत 'एलफिन्स्टन इन्स्टीटयुट'ची एक शाखा होती, तींत करसनदास यांनीं नोकरी धरली. सत्यप्रकाशपत्र केवळ गचाळांपैकीं नव्हतें. तें चांगलें वजनदार असून त्यांतील लेख मोठमोठ्या मंडळीस मान्य होते, व अशाच लोकांत तें जास्त खपे. करसनदास यांचा लिहिण्याचा रोख नेहमीं धार्मिक व सामाजिक सुधारणेवर फार असे, व त्यांचें नांव अजरामर होण्यास त्यांचे लेखच कारण झाले; असें मानण्यास

१ समाधान कोणत्या प्रकारें केलें, हें कोठें कांहीं लिहिलें नाहीं.

बिलकूल प्रत्यवाय नाहीं. त्या लेखांमुळें जो एक चमत्कारिक प्रसंग घडून आला, व ज्यांत करसनदास यांच्या आंगचे गुण प्रकट झाले तो प्रसंग वाचकांच्या नीटपणें ध्यानांत येण्यास थोडीशी मूळ पिठिका सांगितली पाहिजे.

गुजराथ देशांत जे वाणी व इतर वैश्य लोक आहेत, त्यांपैकीं जैन धर्म पाळणाऱ्याशिवाय बाकी सर्व वल्लभी पंथाचे वैष्णव द्वैतमती आहेत ते परमार्थप्राप्तीस भक्तिमार्ग श्रेष्ठ मानतात. या भक्तिमार्गाचें स्वरूप हल्लीं असें कांहीं घाणेरडें होऊन गेलें आहे कीं, साधारण विचारी मनुष्यास सुद्धां त्यांतील चाली रीति पाहून व ऐकून त्यां विषयीं कंटाळा व ओकारी येईल. या पंथाचे जे गुरु आहेत त्यास सर्व साधारण लोक गोस्वामी ( गोसांवी ) महाराज अशा नांवानें ओळखतात. सुरत, अमदाबाद, मुंबई वगैरे मोठमोठ्या ठिकाणीं यांचे आश्रम असून मुख्य गादीची जागा मारवाडांत श्री नाथद्वार येथें आहे. प्रत्येक गादीच्या जागीं जे महाराज असतात, त्यांस हे भोळे वैष्णव लोक परमेश्वर स्वरूपी समजून ज्याप्रमाणें गोकूळ मथुरा, वृंदावन येथें कृष्ण मूर्तीचे विलास करतात, त्याचप्रमाणें या महाराजांचे करीत असतात. आमच्या लोकांत

१ कांहीं वाणी नव्या स्वामीनारायण पंथांतही शिरलेले आहेत.

पुरुषांपेक्षां स्त्रिया जास्ती धर्मभोळ्या; तेव्हां पुरुष जितक्या मनोभावानें महाराजांची सेवा करीत असतील, त्यापेक्षां अधिकच सेवा या भोळ्या स्त्रिया या परमेश्वरस्वरुपी मानवाची करतील. यांत मोठेसें नवल नाहीं? स्त्रियांस महाराजांच्या अंतर्गृहांत जाण्याससुद्धां प्रतिबंध नाहीं, कारण महाराजांस त्या परमेश्वराच्या ठिकाणीं मानीत असल्यामुळें त्यांनीं एकांतांत सुद्धां जाऊन महाराजांची सेवा करावी. अशी स्थिति अप्रतिबंध चालत होती. त्यामुळें नीतिमार्गाचें व पवित्राचरणाचें उल्लंघन होऊन पापाचरण होण्याचा पुष्कळ संभव असतो. हा ह्या धर्मांतील अमंगळ प्रकार पाहून प्रस्तुतच्या विद्वान लोकांचें डोकें उठतें; परंतु तो मोडून टाकण्याचें अथवा मोडण्यासाठीं प्रयत्न करण्याचें धैर्य एकांतही नाहीं तोंडाची बडबड करणारे पायलीचे पंधरा मिळतील पण हातानें करून दाखविणारा हजारांत तर काय पण लाखांत एखादा! धर्मांत दुरुस्ती करणें ह्मणजे असें तसें नाहीं. हजारों, लाखों लोकांबरोबर टक्कर घेण्याची; प्रसंगीं पैशाचें व अब्रूचें नुकसान होऊन शिवाय जिवावर बेतण्याची; मग इतकें धोक्याचें व अवघड काम कोण हातीं घेतो? ज्यांनां आपण धर्मगुरु ह्मणतों, मग ते शंकराचार्य असोत, स्वामीनारायण असोत, मुल्ला साहेब असोत, काजीसाहेब असोत,

किंवा पाद्रीसाहेब असोत, त्यांच्यावर सर्व लोकांचा भरंवसा, ते करतील ती पूर्वदिशा. अशा तऱ्हेचें एकंदर लोकांवर त्यांचें वजन असून त्यांच्या वर्तनांतील व्यंगें सामान्य लोकांप्रमाणें काढणें आणि दंड थोपटून व मिशांवर ताव देऊन त्यांच्याशीं लढण्यास तयार होणें ह्मणजे हें कोण धारिष्ट! कसलें साहस! अशाला एक अद्वितीय धैर्याचा पुतळा तरी ह्मटलें पाहिजे, किंवा एक वेडा तरी ह्मटलें पाहिजे. कोणी कांहीं ह्मणो! परंतु हें काम करण्यास करसनदास यांनीं छाती ठोकून हातीं धरलें, हें खरें. व त्यांस तसें करण्यास जें कारण घडलें तें असें:— सन १८५८ नांत गोसावी महाराजांनीं कोणा एकावर देण्याघेण्यासंबंधानें कोर्टांत दावा बांधला. कोर्टांतून रिती-प्रमाणें उभयपक्षकारांस नेमल्या तारखेस कोर्टांत हजर राहण्याचीं समानें निघालीं. गोसावी महाराज ह्मणूं लागले 'आह्मी धर्मगुरु; आमची पवित्रता, आमची वडे-जाव, आमची इभ्रत मोठी; त्याकरितां आह्माला कोर्टांत जावजबाबासाठीं स्वतः हजर राहतां येत नाहीं.' याप्र-माणें त्यांनीं कोर्टाशीं तकरार चालविली. ही गोष्ट सर्वत्र पसरून त्यासंबंधीं जिकडे तिकडे चर्चा चालली; त्यांत, महाराजांनीं कोर्टांत हजर होणें न होणें, हें बाजूस राहून या वल्लभी पंथांतील अनीति, दुराचार, व महाराजांचें अ-

ज्ञान, या विषयीं वर्तमानपत्रांत लेख येऊं लागले व अद्वातद्वा टीका होऊं लागली. करसनदास हे स्वतः वल्लभी पंथीं असल्यामुळें त्या धर्मांतील एकंदर इंगीत यांस माहीत. मग जेव्हां सत्यप्रकाशांतून यांचे लेख प्रगट होऊं लागले, तेव्हां त्या वल्लभीं पंथाचा मर्मभेद होऊं लागला. त्या लेखरुपी गोळ्यांचा मार सहन होईना; आणि कांहीं वेळ अशी भीति पडली होती कीं, वल्लभी पंथाचा कोट या गोळ्यांच्या भडिमारानें पायासकट उलथून पडतो कीं काय? इतर वर्तमानपत्रांतून जे लेख येत असत, त्यांची कोणी विशेषशी पर्वा करीना; परंतु सत्यप्रकाशांतील घरभेद्याच्या बाणांचे तीक्ष्ण प्रहार जिव्हाळीं लागून असह्य होत. असे लेख लिहून करसनदास यांनीं आपल्यापेक्षां अति सामर्थ्यवान् अशा मनुष्याशीं वैर वांधलें, पण येणेकरून त्यांची कीर्ति फार वाढली. ते दृढनिश्चयी असल्यामुळें त्यांच्या बाजूची जी मंडळी होती तीस नेटानें टिकाव धरण्यास जोर आला. महाराजांनीं आपला पक्ष सबळ करण्याकरितां आपल्या सेवकांकडून मोठमोठ्यांकडे शिफारस चालविली. सत्यप्रकाश व इतर वर्तमानपत्रें यांत येत असणाऱ्या लेखांच्याविरुद्ध पंडितांकरवीं लेख लिहिविले; विरुद्ध पक्षांतील लोकांस मंदिरांत दर्शन वंद केलें; वहिष्कारार्चें भय दाखविलें, परंतु

करसनदास यांनीं आपलें लिहिणें बंद ठेविलें नाहीं; व असल्या दरडावणीस अणुमात्र डगले नाहींत; 'मरेन किंवा मारीन', अशा तऱ्हेचा त्यांचा कृतसंकल्प झाला; कित्येक मोठमोठ्या लोकांनीं व आप्तवर्गानीं महाराजांच्या व धर्माच्याविरुद्ध न लिहिण्याबद्दल करसनदासजीस पुष्कळ प्रकारें समजावून सांगितलें; महाराजांनीं कित्येकांच्या मार्फत भिडा खर्च केल्या; परंतु यांचे एकाचे दोन ह्मणून झाले नाहींत शेवटीं महाराजांनीं बहिष्कार पत्र काढलें, व त्याजवर सर्व वैष्ण धर्मी लोकांच्या संमत्तीदर्शक सह्या मागितल्या त्या बहिष्कार पत्रांत अथवा आज्ञापत्रांत 'जो त्याजवर सही करणार नाहीं, तो बहिष्कृत समजावा' असें एक कलम होतें. हें आज्ञापत्र करसनदासांस व तत्पाक्षियांस भेवडावण्याकरितां मुद्दाम काढलें होतें त्यावेळीं त्या पत्रास 'गुलामखित' ह्मणून नांव पडलें होतें. तें काढल्यावर पुढल्या रविवारीं सत्यप्रकाश कसा काय निघतो, याकडे सर्वांचे डोळे लागून राहिले. लोकांत ज्याच्या त्याच्या समजुतीप्रमाणें अनेक तर्क वितर्क चालले होते; शेवटीं एकदांचा रविवार उगवला, आणि सत्यप्रकाश प्रकट झाला. तो वाचून बहुतेकांची छाती दंग झाली! त्या अंकांत, झाल्या कृत्यांबद्दल महाराजांची क्षमा मागण्याचें बाजुसच राहिलें, पण त्या गुलामी-

खतास रंगणांत घेउन त्यावर जो कोरड्यांचा मार उडविला आहे, तो सांगण्याची सोय नाहीं! मारे, धुव्वा धुव्वा उडवून टाकिला आहे! त्या बहिष्कार पत्राची पर्वा कशी ती काडीभरसुद्धां ठेविली नाहीं! तेणेंकरून असें झालें कीं, महाराजांची बाजू खालीं पडून सुधारकांची सरशी झाली असें घटकाभर सर्वत्रांस वाटूं लागलें, आणि करसनदास यांस साह्य करणाऱ्या लोकांची संख्या पण त्याबरोबर वाढली. ज्या तोफेस खिळा ठोकण्याचा महाराजांचा प्रयत्न चालला होता, त्याच तोफेच्या गोळयाखालीं ते चिरडल्यासारखे झाले. महाराजांच्याविरुद्ध अनेक हस्तपत्रकें छापलीं गेलीं, अनेक लेख प्रसिद्ध झाले, चोहींकडे चर्चा सुरू झाली, व त्यामुळें महाराज जिकीरीस आले.

मुंबईस याप्रमाणें दुफळी माजून राहिलेली, तिचा परिणाम भलताच होऊं नये, यास्तव समेट करण्याकरितां मध्यस्थ म्हणून सुरतेहून जदुनाथजी महाराज आले. या महाराजांच्या आंगीं चाणाक्षपणा असून समयसुचकता इत्यादि गुण चांगले वास करीत होते. यांचें मन विद्येनें सुसंस्कृत झालें होतें, व कोणत्याही गोष्टीचा स्थूलपणें विचार करण्याची शक्ति त्याच्या आंगीं आली होती, व त्यांच्या पंथांतील कित्येक अनाचार त्यांस स्वतः असम्मत होते, अशीही लोकांत बोलवा होती. ते मुंबईस आल्यावर

उभयपक्षाचे लोक त्यांस भेटले. त्यावेळीं सर मंगळदास नथुभाई यांच्या मुलींच्या शाळेंत बक्षिसें वाटण्याचा समारंभ होणार होता, त्या समारंभाच्यावेळीं अध्यक्षस्थान स्वीकारण्याबद्दल जदुनाथजी महाराजांस नव्या मंडळीनें विनंति केली; ती त्यांनीं आभारपूर्वक मान्य केली; आणि हजारों लोकांच्या देखत प्रमुखस्थानीं विराजमान होऊन मुलींस बक्षिसें वाटलीं.

महाराज ह्मणजे प्रत्यक्ष ईश्वरावतार; धर्मरुपी भाण्डाराची किल्ली त्यांच्या हातांत; असें असून नव्या सुधारणेंतील स्त्रीशिक्षण हें त्यांस कसें मान्य झालें? हा लोकांस मोठाच चमत्कार वाटला. हल्लीं सुद्धां स्त्रीशिक्षण नको ह्मणणारे शेंकडा पाउणशें निघतील, मग तीस पस्तीस वर्षां मागें स्थिति कशी असावी, याची वाचकांनींच कल्पना करावी. त्यावेळीं साधारण जनसमुहाच्या मताप्रमाणें हजारो प्रेक्षकांच्या देखत स्त्रीशिक्षणास उत्तेजन देण्याचें काम महाराजांनीं केलें, हा एकप्रकारचा त्यांनीं भ्रष्टपणाच केला. सुधारक लोकांनीं महाराजांस भुरळ घातली; असें लोक ह्मणूं लागले. असो, त्या दिवशीं जुन्या डोळ्यांनां नवें कौतुक पोटभर पहाण्यास सांपडलें.

इकडे नवी मंडळी एवढ्यानेंच फुरफुरली, आणि त्यांच्या आनंदास ऊत आल्यासारखा झाला; जुन्या मंडळींची

नाकें चांगलीं ठेंचलीं गेलीं, असें त्यांस वाटलें; ज्या सत्यप्रकाशांत गोसावी महाराजांची सरसकट निंदा येत होती, त्यांतच जदुनाथजी महाराजांची प्रशंसा येऊं लागली; शिवाय, त्यांस असें वाटूं लागलें कीं, ज्याअर्थीं ह्या महाराजांची स्त्रीशिक्षणास मान्यता दिसली, त्याअर्थीं सुधारणेच्या इतर गोष्टींसही ते अनुकूळ होतील, आणि आपणांस आपल्या कामांत यश मिळेल. परंतु ही त्यांची समजूत चुकीची होती, व कोत्याबुद्धीची दर्शक दिसली.

ज्या ठिकाणीं मोडतोड झाली असेल, तेथें दुरुस्ती केलीच पाहिजे; परंतु मोडतोड फार झाली आहे, आणि कोणी ह्मणेल कीं, सर्व दुरुस्ती मी एकदम व एकटाच करीन तर तसें होऊं शकणार नाहीं; सर्वच कामें अपुरीं राहतील, किंवा एखादेवेळीं त्यावर सर्व इमारत कोसळून पडून त्याखालीं तो दबून जाऊन प्राणासही मुकण्याचा संभव आहे; आणि दुरुस्त करणारा मालक ह्याप्रमाणें नाहींसा झाला, ह्मणजे मग ती इमारत तशीच पडत झडत राहून कांहीं दिवसांनीं धुळीस मिळून जाईल. अशा थरास गोष्ट जाऊं नये, म्हणून दुरुस्ती करणें, ती अनेकांच्या साह्यानें व क्रमाक्रमानें करीत गेलें पाहिजे. सुधारणेची हीच गोष्ट आहे, व तिचीं सर्व अंगें एकदम सुरू करणें, हेंही कांहीं वाईट नाहीं; परंतु तीं अंगें संघशक्तीनें व एको-

प्यानें झालीं पाहिजेत. नाहींतर क्रमशः करणें हें उत्तम. कविराज दलपतरामभाई आपल्या एका कवितेंत ह्मणतात " भाई सज्जनहो, सुधारणेचें सार थोड थोडें व प्रेमानें सांगा; कारण साखर ही गोड खरी, पण तिचा जर एक मोठा थोरला खडा घेऊन हजारो मुंग्यांच्या थव्यावर ठेविला, तर त्या खालीं त्या बिचाऱ्या चिरडून जातील; पण त्याच खड्याचा भुगा करून जर पसरून ठेविला, तर तो त्या सुखानें खातील." तसेंच, रानांतून जर एखादा बैल धरून आणून लागलाच गाडीला जोडून शहरांतून फिरविला, तर नव्या वस्तूंच्या दर्शनानें एकदम बुजून भडकून गाडीची व गाडी हांकणाराची दुर्दशा करून टाकील; आणि पळून जो पुनः रानांत जाईल तो हातीं सांपडतांना मुष्कील पडेल. यास्तव जुन्या समजुतीच्या लोकांस नव्या गोष्टींची ओळख क्रमाक्रमानें पण दृढनिश्चयानें करून दिली पाहिजे पण ही गोष्ट लक्षांत न राहून करसनदास व त्यांचे स्नेही घसरले; त्यांनीं जो उतावळेपणा केला तो त्यांस कसा भोंवला, हें पुढील हकीकतीवरून समजून येईल.

वर सांगितलेला मुलींच्या शाळेंतील बक्षिसें वाटण्याचा समारंभ झाल्यावर कवि नर्मदाशंकर वगैरे सुधारकांनीं स्त्री-पुनर्विवाहाचा मोठा अवजड प्रश्न पुढें आणला. या

मुळें गोष्ट विथरली. जदुनाथजी महाराजांचा सर्वस्वी आधार आपल्या अज्ञानी व भोळ्या वैष्णव भक्तांवर होता. ते जोंपर्यंत अनुकूळ आहेत, तोंपर्यंतच यांची सर्व मिजास व बडेजावी चालणार; नव्या मंडळीकडून त्यांस काय मिळणार आहे? तशांत हा विधवाविवाहाचा प्रश्न पुढें आल्यावर सेवक लोक जदुनाथजी महाराजांचे कान भरूं लागले कीं, नवी मंडळी सर्व नास्तिक आहे, त्यांचे शिंतोडे तुह्मांस नडतील, बोट चुंफावयाला देतां ते हात चावून खातील; याप्रमाणें अनेक दुष्ट कल्पनांची महाराजांच्या मनांत प्रेरणा केली महाराजांनीं स्त्रीपुनर्विवाहास आपली अमान्यता प्रगट केली. त्यावर नर्मदाशंकर यांनीं महाराजांस विज्ञप्ति पत्र लिहून वादयुद्ध मागितलें. पण त्यांवेळीं नव्या मंडळींत जुन्या शास्त्रांत पारंगत असा कोणी नव्हता. साधारण बहुश्रुत असे ठक्कर मथुरादास लवजी आणि नर्मदाशंकर एवढेच कायते दोघेजण होते. महाराजांनीं वादयुद्ध कबूल केलें. एक मोठी थोरली सभा भरली. महाराजांचा मतलब, कसेंही करून, आपला पक्ष त्या सभेंत बहुजनसंमत ह्मणजे खरा करून घेण्याचा होता; यास्तव 'ज्या शास्त्रग्रंथानुरोधानें वादविवाद करण्याचा ते ग्रंथ तुह्मी ईश्वरप्रणीत समजतां कीं नाहीं'? हा प्रश्न त्यांनीं सुरुवातीसच नव्या मंडळीस केला. 'या प्रश्नाची तूर्त ज-

रूर नाहीं, पुढें मागें याचा निर्णय करितां येईल,' असें उत्तर नव्या मंडळीनें देऊन 'ऋषीप्रणीत शास्त्रानें विधवाविवाह सिद्ध होतो कीं नाहीं,' हा मुद्दा निराळा काढून प्रतिपक्ष्यांनीं आणलेल्या निग्रहस्थानांतून सुटून जावयाचें होतें. परंतु कच्च्या सुधारकांस मागला पुढला पोंच व काळ वेळाचें धोरण नसतें, ते असतात उतावळे झालेले; त्याप्रमाणें येथेंही ग्रंथाची बाब बाजूस ठेऊन मुख्य विषयावर बोलणें सुरू करण्याचें असतांना तसें न करितां "शास्त्रें हीं ईश्वरप्रणीत नाहींत" असा पटकन् जबाब देऊन चुकले. जदुनाथजी महाराजांस यांच्या तोंडून एवढेंच वदवावयाचें होतें; शास्त्रांची नास्तिकता यांच्याच तोंडून सिद्ध झाली; तेव्हां हे पूर्वपक्ष करणारे लोक सर्व नास्तिक आहेत; असें महाजन मंडळीनें व साधारण एकंदर लोकांनीं ठरवून नव्या मंडळीच्या नांवानें हुर्यो करून सभा विसर्जन केली. नास्तिक ह्मणजे कोणास ह्मणावें याचा हल्लींसुद्धां सदरहू शब्द योजितांना कोणी खरा अर्थ पहात नाहींत. असो, त्यादिवशीं केलेल्या उतावळीबद्दल नव्या मंडळीस मागाहून पश्चात्ताप झाला. व तो सत्यप्रकाशांतील लेखांवरून स्पष्टपणें समजला गेला.

याप्रमाणें सभेंत नव्या मंडळीचा लाग फावला नाहीं. परंतु लेखनद्वारा वादविवाद करण्यांत ते जास्ती अनुभ-

विक, समर्थ व कुशल होते, ह्मणून सत्यप्रकाशांतून याच विषयाची चर्चा चालविली. त्यास प्रत्युत्तर ह्मणून जदुनाथजी महाराजांनी ' स्वधर्मवर्धक आणि संशयच्छेदक ' या नांवाचें मासिकपत्र सुरू केलें. याप्रमाणें पुनः वादयुद्ध जुंपलें. त्यांत स्त्रीपुनर्विवाहाची गोष्ट तर कोठच्या कोठेंच राहून आर्यधर्मशास्त्रें आणि आचारविचार याविषयींच चर्चा चालू झाली. होतां होतां, दोहों बाजूच्या लोकांनीं वादाची मर्यादा सोडून शांतपणा व विवेक बाजूस ठेऊन आवेशाच्या भिरिरींत अद्वा तद्वा बहकले. लेखनद्वारा वाद चालविण्यांत नव्या मंडळीपुढें जुनी मंडळी टिकेना. व ती जसजशी हटत चालली, तसतसे त्यांचे लेख एकेरीचे येऊं लागले. पण कांहीं केल्या विजयध्वज हातीं लागेलसा रंग दिसेना, व सामनेवाला जेरीस येईना. शेवटीं न्यायासना पुढें गाऱ्हाणें रडून प्रतिपक्ष्यांस पराजित करण्याचा जदुनाथजी महाराजांचा निश्चय झाला. तारीख २१ आक्टोबर सन १८६० ह्या दिवशींच्या सत्यप्रकाशाच्या अंकांत 'प्राचीन हिंदूधर्म' या शिरो लेखाखालीं जो विषय लिहिला होता तो आपली निंदाव्यंजक आहे, ह्मणून सत्यप्रकाशाचे अधिपती करसनदास मुळजी व मालक शेट नानाभाई रुस्तमजी राणीना यांजवर अब्रूनुकसानीबद्दल हायकोर्टांत पन्नास हजार रुप-

यांचा दावा लाविला. पण त्याबरोबर वल्लभीपंथाच्या धर्मसंस्थेस पुष्कळ हानि करून घेतली

आतां या खटल्यांत दुतर्फी अनुकूळ व प्रतिकूळ गोष्टी कसकशा होत्या तें पाहूं. महाराजांच्या तर्फेनें द्रव्यद्वारा व शरीरद्वारा साह्य करणारे त्यांचे सर्व धर्मानुयायी लोक होते. वाणी, भाट्ये वगैरे लोक या धर्माचे असल्यामुळें पैशासंबंधीं त्यांस बिलकूल पंचाईत नव्हती. ते लोक श्रीमंत पडले, आणि सरकार दरबारांत यश मिळविण्यास सोन्या रुप्याच्या गोळ्यांनीं लढलें पाहिजे, अशी सर्व साधारण लोकांची समजूत; त्याप्रमाणें त्या सामुग्रीचा पुरवठा महाराजापाशीं रगड होता, ह्मणून महाराज जिंकतील, असें सर्वत्र वाटलें. विरुद्ध तर्फेनें पाहूं जातां, त्यांस या कज्यांत फक्त स्वतःचें रक्षण करण्याचें होतें; महाराजांस स्वतःचें रक्षण करून सामनेवाल्यास मारण्याचें असें दुहेरी काम होतें. नव्या मंडळीस महाराजांसारखी जरी पैशाची भरपूर अनुकूळता नव्हती, तथापि, पैशाकरितां अडून बसावें लागेल, अशीही स्थिती नव्हती. तसेंच यांच्या तर्फेच्या मंडळीची संख्या जरी थोडी होती, तथापि, त्यांच्यांत एकदील व संप होता व ती निवडक व ठळक अशी होती. शिवाय एकंदर सुधारणापक्षाचे लोक म्हणजे ख्रिस्ती, ब्राह्मधर्मी, नामांकित विद्वान पारशी लोक, विश्वनाथ नारा-

पण मंडलीक, डाक्टर भाऊदाजी, वगैरे यांच्याच तर्फेचे होते, त्यामुळें एखादी सल्लामसलत हवी तेव्हां मिळत असे. त्यांत आणखी आनेस्टी साहेब वारिस्टर मिळाले, त्यामुळें सर्वच काम भक्कम झालें.

ठक्कर मथुरादास लवजी लखमीदास खिमजी, रामदास भाणजी वगैरे गृहस्थांनीं करनदास ह्यांचें सर्वोपरी उत्तम पाठवळ केलें. त्यांत मथुरादास हे तर कायावाचामनें करून झटत होते. व हे पहिल्यापासूनच या प्रकरणांत असून पुढारी असल्यामुळें जे लोक नव्या मंडळीच्या तर्फेचे होते, त्यांस 'मथुरापंथी' असें नांव लोकांत पडलें. जर करितां या शेटजींचें आणि लखमीदास यांचें करसनदासजीस साह्य नसतें, तर या कज्ज्यांत जें यश मिळालें, तें मिळतें कीं नाहीं, याची शंका होती.

असो, तारीख २९ जानेवारी सन १८६२ रोजीं हायकोर्टांत सर म्याथ्यु सॉस आणि सर जोसेफ आरनोल्ड या दोन न्यायाधिशांपुढें हा खटला चालू झाला. त्यावेळीं हायकोर्टांत अठरापगडजातीच्या लोकांची ही गर्दी झाली होती. आणि खटल्याचा शेवट होईपर्यंतही गर्दी अशी होत असे. कोर्टांत हें काम एकसारखें तेवीस दिवस चाललें. वादी प्रतिवादी तर्फे एकंदर त्रेसष्ट साक्षी झाल्या. दोन्ही तर्फेच्या वारिष्टरांनीं आपली विद्वत्ता, तर्कशक्ती,

कोटिक्रम, वगैरे करामत करून दाखविली. साक्षिही कित्येक मोठ्या गमतीच्या झाल्या. अखेर प्रतिवादीच्या तर्फे निकाल मिळाला, आणि गोसावी महाराजांचा नक्षा उतरला! येथें एकट्या जदुनाथजी महाराजांचाच नक्षा उतरला, असें नव्हे, तर सर्व महाराजांचा अथवा महाराजांच्या गादीचा नक्षा उतरला, असें म्हणण्यास हरकत नाहीं. कारण, ते 'महाराज' या पदवीच्या इतमामासाठीं, अब्रूसाठीं, व हक्कांसाठीं भांडत होते

या कज्ज्याचें 'धी महाराज लायबेल केस' या नांवानें इंग्रेजींत आणि गुजराथींत पुस्तक छापलें आहे, तें मोठें मजेदार वाचनीय पुस्तक आहे. त्यांत महाराज व त्यांचे भक्त व भक्तिणी यांच्या गुह्य गोष्टीची चर्चा, निन्दा, आणि फजिती अगदीं उघड उघड झालेली दिसत आहे या खटल्यांत दुतर्फा मिळून साठहजार रुपये खर्च झाला. पैकीं जवळजवळ पन्नासहजारांस वादी बुडाले, व त्याशिवाय त्यांची इतर हानि झाली ती वेगळीच!

या खटल्यावरून करसनदास यांचा फारच वाहवा व मान्यता लोकांत झाली मोठमोठ्या लोकांनीं त्यांचें अभिनंदन करून त्यांच्या स्तुतिपर पत्रें लिहिलीं. करसनदास यांची पाठ थोपटणारांत नामांकित डाक्टर विल्सन हे अग्रगण्य होते. नामदार गव्हरनर सर बार्टल फ्रियर, डा.

भाऊ दाजी, डा. मरे मिचेल, सर अलेक्झांडर ग्रांट, विश्वनाथ नारायण मंडलीक, होर्मसजी दादाभाई यांनींही त्यांची फार फार प्रशंसा केली. कित्येक ठिकाणीं लोकांनीं सभा भरवून त्यांस मानपत्रें दिलीं. त्यांच्या धारिष्टाबद्दल व देशहिताच्या कळकळीबद्दल जे लेख इकडील व विलायतेच्या वर्तमानपत्रांतून आले आहेत, तशींच यांस जीं सर्टीफिकिटें मिळालीं आहेत, त्यांचें एक बरेंच मोठें पुस्तक झालें आहे. त्यांच्या गुणांची बहुमान्य जनांनीं जी तारीफ केली व जे प्रशंसालेख लिहिले आहेत त्यांतील थोडथोडे उतारे मासल्याकरितां देऊं म्हटलें, तरी पुष्कळ जागा अडून जाईल यास्तव तसें प्रस्तुत करितां येत नाहीं. परंतु सांगण्याचें म्हणून इतकेंच कीं, या प्रसंगानें करसनदास यांच्याठायीं असलेली सारासार विचारशक्ति, सहनशीलता, सत्यप्रियता, धारिष्ट व देशहिताची कळकळ इत्यादि गुण प्रकट झाले. प्रत्यक्ष धर्माचार्यांच्या विरुद्ध झाल्यामुळें बहिष्काराची तरवार मारण्यास उगारलेली असतांनासुद्धां तिला न जुमानतां व न भितां धर्मांतील व्यंगें, पाखंडें व अनाचार यांचा स्फोट केला ! हें काय लहानसान कृत्य म्हणावें काय ? व्यक्तिमात्राच्या, समाजाच्या व देशाच्या उन्नतीस ज्याप्रमाणें विद्यावृद्धि अत्यावश्य आहे, त्याप्रमाणें किंबहुना जास्तीच धर्मोन्नती होण्याचीही पण गरज आहे,

व तिच्या अंगभूत पुष्कळ गोष्टी सुधारतां येतील; हें सगळे विद्वान कबूल करितात. आतां आमच्याइकडे विद्याप्रसाराचें काम तर सरकारानेंच हातीं घेतलें आहे, त्यामुळें त्या संबंधीं कांहींएक पहाण्यासारखें राहिलें नाहीं * नाहीं म्हणण्यास ख्रिस्ती मिशनरी लोक या कामीं झटत असून आपल्या लोकांनीं प्रयत्न करून कायती एक डेक्कन एज्युकेशन सोसाइटी मात्र स्थापित केलेली दिसते याशिवाय मोठासा इतरत्र प्रयत्न झालेला दिसत नाहीं परंतु धर्मोन्नती करणें, हें आपणांशिवाय इतरांस† कसें सोपविनां येईल ? सरकार तर त्याकामीं तटस्थ आहे. धर्मोन्नती व्हावी म्हणून आजपर्यंत कित्येकांनीं कंबरा बांधल्या असतील, परंतु बहिष्काराची उग्रमूर्ति समोर दिसल्याबरोबर कंबरा ढिल्या करून इतरांबरोबर अधर्मातील अनाचाररुपी चिखलांत ते लोळतच पडले. पुऱ्या धैर्याचा असा एखादाच माईचा पूत निपजतो बाकी त्याचें पाठबळ करण्यास

---

* हल्लीं सरकार लोकशिक्षणाच्या कामांतून थोडथोडें अंग काढून घेत आहे हें चिन्ह मात्र चांगलें नाहीं !

† मलबारी शेठजींनीं 'हिंदुलोकांतील बालविवाह व असंमत वैधव्य' हा विषय हातीं घेऊन आमच्या धर्मसुधारणेचा श्रीगणेशायनमः केला होता, परंतु परधर्मीयांस आमच्या सनातन धर्मात लुडबुड करण्याचा अधिकार काय ? अशाबद्दल आमच्या विद्वानांस (?) घुस्सा आला होता.

शेंकडो असतात. पण ते सर्व आंकड्यावरील शून्यांसारखें एका आंकड्यावर हवीं तितकीं शून्यें दिलीं, तथापि जों-पर्यंत तो पाठिमागें आंकडा आहे, तोंपर्यंतच त्या शून्यांची किंमत. तो आंकडा पुसून टाकिला कीं, बाकीं सारीं शून्यें-च ! लढाईत हजारो शिपाई 'सबसें जीव प्यारा' तो सुद्धां पटापट सोडतात, पण त्यांची कीर्ति न होतां इति-हासांत सेनानायकाचेंच नांव नोंदलेलें राहतें. याचप्रमा-णें या कामांत करसनदासजी यांस जरी मोठमोठ्याचें कायावाचामनेंकरून पाठबळ होतें, तथापि त्यांच्या मागून बाकीच्या साऱ्यांचीं नांवें. सारांश, विद्यालंकृत सुधा-रकानें सामाजिक असो, धार्मिक असो, कोणत्याही बाबतींत सुधारणा करण्याचें मनांत आणल्यास आपल्या कपाळीं धैर्याचा तिलक सदा ठळठळीत राखला पाहिजे.

करसनदासजींचीं सुधारणेसंबंधीं मतें काय होतीं, म्हणजे सुधारणा कां हावी व कशी केली पाहिजे, इत्यादि बाबतींत निरनिराळ्या प्रसंगीं त्यांच्या लेखांतून व भाषणांत व अनेक गृहस्थांशीं संभाषण करतांना जीं मतें स्पष्ट व्यक्त झालीं आहेत, त्यांचें सारांशरूपानें येथें दिग्दर्शन केलें असतां अप्रस्तुत व अनाहुत होणार नाहीं. वाचकांच्या माहिती करितां भाषणांतील किंवा लेखांतील थोडथोडे उतारे घेऊं म्हटलें, तरी मजकूर फारच फुगू लागला. छाटाछाट करून

पाहिली, परंतु नीट जमेना. तेव्हां गोषवाराच देणें भाग पडलें. त्यांतही कित्येक दाखले वाचकांच्या सोईसाठीं केवळ नवे असे द्यावे लागले आहेत, त्याजबद्दल वाचक वर्ग आम्हांस क्षमा करील, अशी आशा आहे.

'कोणत्याही गोष्टींत सुधारणा काळ करूं शकत नाहीं. तीस कारण, अथवा चालक अथवा गती देणारा मनुष्यच आहे.' असें एक तत्ववेत्ता ह्मणतो. खरें आहे. काळानें जर सुधारणा होती तर मनुष्याची धडपड इतकी कशास पाहिजे होती? काळच जर प्रत्येक गोष्टींत सुधारणा करील, तर काळाचा भरंवसा धरणाऱ्यांनीं दाखल्याकरितां सरकारास प्रथम इंजिनेरखातें अजिबात कमी करण्यास सांगावें, म्हणजे सरकारचा तेवढा खर्चापरी खर्च वाचून सडका, पूल, इमारती वगैरे कामें काळाकडून बिन खर्चानें आपोआप दुरुस्त होतील; आणि हा अनुभव जर सरकारास फायदेशीर वाटला, तर सरकार विद्याखात्यालाही तोच प्रयोग लागू करील. याप्रमाणें इतर सर्व खात्यांची हळूहळू वासलात लावण्यास सरकारास ठीक पडेल. पण आमचें सरकार कोठें इतकें शहाणें आहे! तें काळाचा मुळींच भरंवसा धरून रहात नाहीं. तें म्हणतें कीं, हातपाय हालविल्याशिवाय शरीर जगावयाचें नाहीं; काळाचा भरंवसा धरून तो स्वाधीन राहणार नाहीं; मनुष्यानें त्याच्या झिंझ्या धरून त्यास

वांधून टाकिलें पाहिजे; नाहींतर त्याच्या भराऱ्या कधींच संपावयाच्या नाहींत. वस्तुस्थितींत सुधारणा म्हणून करावयाची नाहीं; काळानें काय होईल तें खरें; असें म्हणून हा काळ्या डोईचा मनुष्य आजपर्यंत स्वस्थच बसला असता तर, परमेश्वराससुद्धां व्यर्थ ही सृष्टि केली! असा पश्चात्ताप झाला असता. पण तसें नाहीं. मनुष्याच्या डोक्यांत एक बुद्धिरूपी किडा त्यानें निर्माण केलेला असतो. मनुष्याचें डोकें दुःखानें, अडचणीनें संकटानें व अनेक बिकट प्रसंगानें तापलें, होरपळलें, भाजलें म्हणजे तो किडा जागा होऊन आंत वळवळ करूं लागतो, आणि आलेल्या दुःखांचें, अडचणींचें, संकटांचें, व बिकट प्रसंगाचें कसें निवारण होईल. याचा उपाय तो सुचवितो; मग मनुष्य प्रत्येक गोष्ट आपणास सोईकर करून घेतो. सोईकर करून घेणें, म्हणजे आपल्या मताप्रमाणें तिला चांगलें वळण देणें, हें होय. म्हणजे तींत सुधारणा करणें, हेंच होय याप्रमाणें आदिकालापासून मनुष्य सुधारणेच्या पाठीस लागलाच आहे. ती सुधारणा आज कोणऱ्या स्थितीस पोंहचली आहे, हें सर्व जग पहातच आहे. आणि अशाच नेटानें जर सारखी ती चालत राहिली तर साधुकबिरानें ह्मटल्या प्रमाणें "नर जो आपनी करणी करे तो न-

रका नारायण होय" असें एकंदर होण्याचा संभव नाहीं असें म्हणतां येणार नाहीं.

दोन तीनशें वर्षांमागें सुधारणेचा गाडा ज्या वेगानें चालत होता, किंवा, पांच पन्नास वर्षांमागें ज्या वेगानें चालत होता, त्यापेक्षां हल्लीं त्यास जास्त वेग आलेला आहे हें खचित. परंतु तो जसा युरोपांत किंवा अमेरिकेंत चालत आहे तसा येथें चालत नाहीं. कारण आमचे आधुनिक पदवीधर लोक ज्यांस आम्ही सुशिक्षित किंवा विद्वान म्हणतों; व ज्यांच्या खांद्यावर सुधारणा शकटाचें जूं आहे, असें म्हणतों, ते आम्हांस लेंचें पेंचें दिसत आहेत. ते विश्वविद्यालयांत हरहुन्नर ( कला ) शिकले खरे, पण धैर्य शौर्यादि गुण ते विसरले; हे असले धडे तेथें त्यास शिकाविले नाहींत, किंवा ज्ञानार्जनांत शक्तिपात झाल्या मुळें त्यांच्या आंगचें धैर्य नाहींसें झालें, काय असेल तें असो! या नूतन विद्वन्मण्यांची अशी कांहीं गम्मत दृष्टीस पडते कीं, राष्ट्रोन्नतींत मोठा भाग धर्मसुधारणेचा आहे, हें त्यांस कबूल आहे; धर्मसुधारणा झाली पाहिजे असें त्यांस वाटतें; पण वडील माणसांच्या धाकास्तव, लोकापवादास्तव, व धर्मगुरूकडून बहिष्काराची शिक्षा मिळेल या भीतीस्तव ती सुधारणा करण्यास त्यांच्यानें हात घालवत नाहीं. कोणी एखादा दंड थोपटून पुढें सरसावतो, पण

त्यांस मागलें पाठबळ नसल्यानें तो तेव्हांच माघारीं परततो. नाहीं परतला, तर एकटाच इतस्ततः भ्रमण करीत लोकसमुदाया पासून निराळा राहतो, आणि समयविशेषीं वेडापीर अथवा भ्रमिष्ट असें नामाभिधान पावतो. असें न होतां समाजाचें अग्रेसरत्व पतकरून समाजास बरोबर घेऊन जर तो चालूं लागला, तर जे समाज सुधारणारणांत हतवीर्य झालेले असतात, अथवा भेकडपणामुळें ज्यांनां समोर मैदानांत येण्यास भीती वाटते, ते त्या धुरीणास शक्त्यनुसार पाठबळ देण्याचें व समाजसुधारणेचा गाडा पुढें रेटण्यास मदत करण्याचें, तें काम न करितां हा लोकाग्रणी ह्मणवून घेत आहे, हेंच त्यांच्या डोळ्यांत खुपतें, आणि त्याचा मत्सर करून त्याजविषयीं खोट्या नाट्या कंड्या लोकांत पिकवून लोकांचीं मनें दूषित करून आडून गोळ्या मारून, त्यास खालीं ओढून पाडण्याचा प्रयत्न करितात. लोककल्याणाचीं कामें अंगावर घेऊन रेटून करण्यास आपण असमर्थ आहों, तर जे लोक तीं करीत आहेत, त्यांस यथाशक्ति साह्य देणें, हें आपलें कर्तव्य आहे. हा सज्जनांचा मार्ग ते विसरतात, आणि मुद्दाम शिंगें मोडून वासरांत शिरून राक्षसी कृत्य करण्यास ते धजावतात. युरोपांत लुथरसारखे धर्मसुधारक पुरुष झाले. फ्रांकलीन, वाशिंगटनसारखे देश सुधारक,

देशोद्धारक वीर पुरुष झाले. म्हणून ते काय परमेश्वरासारखे सकलगुणसंपन्न होते कीं काय! त्यांचें खासगी व लौकिक वर्तन अगदीं निर्दोष होतें कीं काय? ते तर मनुष्यांसारखे मनुष्यच होते. एकना एक, कांहीं तरी दोषांचें वर्तन त्यांचे हातून झालेंच असेल. परंतु हंसक्षीरन्यायानें त्यांचे दोष कोणी बाहेर काढीत नाहींत, गुणच घेतात. ते आज जगाला वंद्य होऊन बसले आहेत. त्यांच्या वेळेस त्यांच्या बरोबरीचे लोक असलेच पाहिजेत. परंतु या महात्म्याचा मत्सर करून त्यांनीं सुधारणाशकट अडकवून पाडला नाहीं. उलट यथाशक्ति मदतच केली असेल किंवा आपल्याकडून हरकत उपद्रव पोंहचूं नये म्हणून त्यांचें नांव तरी टाकलें असेल. आमच्याकडे विद्वानांस मत्सरानें व परोत्कर्षाऽसहिष्णुतेनें अगदीं ग्रासल्यामुळें त्यांस चारीबाजू काळचाच* दिसतात.

प्रस्तुतच्या विद्वानांत कांहीं लोक कोणत्याही सुधारणेविषयीं उदासीन असतात. त्यांच्यांत स्वहितबुद्धि किंवा स्वार्थबुद्धि या शिवाय इतर सद्वासनांचा मुळीं अंकुरच नसतो, ते सरकारी शिधा पत्करून सुखा चैनींत असतात. रिकाम्यावेळांत विड्या व बिझिक यांतच तल्लीन झालेले असतात; डागदागिने, पैसा आडका, मालमत्ता इत्यादि

* आमच्यांत एकमेकांविषयीं मत्सरबुद्धि कशी जागृत आहे हें

३

मिळविण्यांत गर्क होऊन त्यांतच फुशारकी मारीत असतात; आपल्या ताब्यांतील रय्यत व आपण एकदेशीय आहों, व सर्व आपण परतंत्र आहों, हें त्यांच्या ध्यानीं मनींसुद्धां नसतें; अधिकाराच्या व संपत्तीच्या मदानें ते ताठलेले, फुगलेले, व सदा कुर्य्यांत असतात; गरीब रयतेशीं दोन शब्द बोलण्यांत त्यांस आपली मानहानी झालीशी वाटते; आपल्या ज्ञानसंपादनाची इतिकर्तव्यता आपल्या गोरकाय वरिष्ठांची मर्जी सुप्रसन्न ठेवण्यांतच कायती समाविष्ट होऊन राहिली आहे, असें त्यांस वाटतें; रपोट करण्यांत सदोदित कालक्षेप होत असल्यामुळें अशा विद्वद्रत्नांस[1] (?) इतर सार्वजनिक, सामाजिक, व धार्मिक गोष्टींसंबंधीं माहिती करून घेण्यास सवड होत नाहीं, त्यामुळें त्यांचीं मनें प्रशस्त, उदार, व धीर अशीं होत नाहींत, आणि कोती मात्र होऊन जातात. त्यामुळें इतर देशहितैषी लोक समाजसुधारणा पाहिजे आहे, धर्मसुधा-

---

१ सरकारचे नोकर असूनही लोक कार्यरत झालेले, देशहिताची कळकळ बाळगणारे, हस्तें परहस्तें सार्वजनिक कृत्यांस साह्य करणारे, आपल्या अधिकाराचा दर्जा बाजूस ठेऊन सर्व प्रकारच्या लोकांत मोकळ्या मनानें मिसळून त्यांस देशसुधारणेच्या दोन गोष्टी शिकविणारे, वरिष्ठांच्या तब्येतीपुढें स्वाभिमानाची, स्वमताची, व स्वतांच्या योग्यतेची पायमल्ली न करणारे, असेही सत्पुरुष बरेच दृष्टीस पडूं लागले आहेत, ही मोठी भाग्याची गोष्ट होय.

रणा पाहिजे आहे, ह्मणून कितीही कंठशोष करीत असले, तथापि त्यांच्या ह्न्मंदिराच्या देवडीवर सुद्धां मुळींच दाद लागत नाहीं. असले लोक देशांत होऊन न होऊन सारखेच. आमचा देश जर ह्मणाला कीं, हे लोक 'खायला काळ आणि भुईला भार' आहेत, तर त्याचें म्हणणें वावगें होणार नाहीं. असल्या लोकांशीं आम्हांस कांहीं कर्तव्य नाहीं. सुधारक व दुर्धारक यांच्या युद्धांत आम्ही त्यांस मुळींच गणीत नाहीं. ज्या विश्वविद्यालयानें त्यांस कलावंत पदवीधर केलें, त्यास त्यांची लाज! पुणेवैभवकारांनीं जर यांजवर ग्रामण्यास्त्र सोडलें तर फायदेशीर खासें होईल.

असो देशोन्नती होण्यास कोणी म्हणतो, 'देशाचा व्यापार वाढला पाहिजे', कोणी म्हणतो, 'कलाकौशल्य वाढलें पाहिजे,' कोणी म्हणतो, 'शेतकीसुधारणा झाली पाहिजे,' कोणी म्हणतो, 'राज्यपद्धती व कायदे सुधारले पाहिजेत,' कोणी म्हणतो, 'स्त्रिशिक्षणाचा प्रसार झाला पाहिजे,' कोणी म्हणतो, 'समाजसुधारणेवर देशोन्नती अवलंबून आहे,' कोणी म्हणतो, 'धर्मसुधारणा हें सर्वांचें मूळ असून ती प्रथम झाली पाहिजे व जातीभेद मोडला पाहिजे', म्हणजे सर्व गोष्टी सुलभ होतील, कोणी म्हणतो, 'देशोन्नतीचा पाया अथवा आदिकारण विद्याप्रसार अथवा लोकशिक्षण हें आहे, तें करून लोकाज्ञानध्वंसनानें खऱ्या

ज्ञानाचा प्रकाश पाडून सुधारणा केली, तरच ती खरी व कायमची सुधारणा,' कोणी म्हणतात, 'सर्वच गोष्टी चोहोंकडून एकदम सुरू झाल्या पाहिजेत.' याप्रमाणें प्रत्येकाची वेगवेगळी समजूत आहे. तें कसेंही असो, सुधारणेचें निरनिराळें अंग क्रमानें सुरू होवो, किंवा ती सर्वांगसुंदरी सुधारणा आपल्या परिवारासह हळुहळू प्रगट होऊं लागो, कांहीं झालें, तरी उत्तमच आहे. परंतु आपलें म्हणणें तें खरें, किंवा आपला पक्ष तो खरा, आणि इतरांचें म्हणणें अथवा पक्ष खोटा; अशा दुरभिमानानें सुधारणाचमूंतच जर लाथाळी माजली, तर पुणेंवैभव व दीनबंधू या उभयतांचा हातांत हात कोण घालून देईल? स्वराज्यांत आपसांतलीं वैमनस्यें काढून झगडत असतां इसापनितिंतल्या गोष्टीप्रमाणें वानर सगळाच खवा खाऊन बसलें. त्याचप्रमाणें पुणेंवैभव व दीनबंधु यांच्या ओढाताणींत विचारा हिंदुधर्म तुटून कोणाच्याच हातीं लागणार नाहीं; आणि मग धर्माकरितां येशूच्या मेंढपाळांकडे पहावें लागेल. ते काय बिचारे टपूनच बसले आहेत. एके ठिकाणीं चरत असलेल्या चार बैलांत फाटाफूट कधीं होईल, ह्मणून सिंहाची एकसारखी खटपट चाललेली आहे. एखाद्या युरोपियानें ह्मटलें कीं "हिंदुलोकांचे प्राचीन धर्मग्रंथ फारच चांगले आहेत, त्यांत

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे

ईश्वराविषयीं व त्याच्या विभूर्तीविषयीं फार चांगला विचार केला आहे." असें ह्मटलें कीं, वैभवेबोवा फुगून लागल्याच वाह्या मागें सारूं लागतात इकडे एखाद्या पाद्र्यानें किंवा दुसऱ्या युरोपीयानें जर ह्मटलें कीं 'हिंदू लोकांची निकृष्टावस्था होण्यास सांप्रत रूढ असलेला त्यांचा धर्मच कारण आहे, धर्मग्रंथ ब्राम्हणांनीं लिहिले, त्यांत त्यांनीं स्वज्ञातीबद्दल पक्षपात फार केला आहे" असे उद्गार श्रवणीं पडल्याबरोबर दीनांचा बंधू एकेरीवर येऊन डुरकण्या फोडूं लागतो. अशा स्थितींत टपून बसलेल्या सिंहाचा लाग कां फावणार नाहीं ? आमच्या धर्माचे वाटेल त्यानें येऊन लचके* तोडावेत; रूढ धर्मावरून वाटेल त्यानें ये-

* आमचा मुळचा दोन हजार किंवा चार हजार वर्षांपूर्वींचा जो धर्म, किंवा ज्याला वेदकालीन् सनातन हिंदूधर्म ह्मणतात, त्याचा आज ठावठिकाणाच नाहींसा झाला आहे. जसजसा वेळ बदलत गेला. तसतसें लोकांनीं आपआपल्या सवडीप्रमाणें त्यांत रूपांतर करून टाकलें आहे. परंतु वेदाज्ञा उल्लंघन केल्याबद्दल त्यांस कांहीं दंड झालेला नाहीं. हिंदूधर्मावर पहिला मोठा प्रहार बौध्यधर्मानें केला. शंकराचार्यांनीं आदिधर्माचें पुनरुज्जीवन केलें ह्मणतात, पण त्यांनीं ही कित्येक बौद्धधर्माच्या गोष्टी पसंत करून त्या प्ररूढ केल्या; त्यामुळें मुळच्या वैदिकधर्मात बदल झालेला आहेच. रामकृष्णादि अवतारानंतर भक्तीमार्गाचें प्रस्थ फार माजलें. मध्वाचार्या सारख्यांनीं अद्वैतमताचा उच्छेद मांडून द्वैतमत स्थापन केलें, व पुढें जसजसा

ऊन हिंदूधर्माची निंदा करावी; अशी स्थिती आमची आम्ही करून घेतली आहे. आम्हांस घरीं दारीं, उठतां ब-

काळवेळ बदलत गेला, तसतसे द्वैतमार्गातच निरानिराळे पंथ भक्तीचें रूप धरून उत्पन्न झाले. अद्वैतमत मागेंच पडलें. भक्तिमार्ग जितका जोरावला आहे, तितके अद्वैतमत खालावलें आहे. आज हिंदुधर्माचे पंथ किती आहेत ह्मणून सांगावें? कबीरपंथ, दादुपंथ, वारकरी पंथ, वल्लभी पंथ, नाथपंथ, स्वामी नारायण पंथ, रामदासी पंथ, मानभावी पंथ, नागा नंदी रामानुज हनुमानसांप्रदायी, चैतन्य पंथी, बसवण्णाचा लिंगाइतपंथ, गुरू नानकाचा पंथ इत्यादि अनेक आहेतच. ते जुने झाल्यामुळें लोक त्यांचा तिटकारा करीत नाहींत. पण आतां ब्रह्मसमाज, प्रार्थनासमाज, आर्यसमाज, सत्यशोधक समाज, सत्यधर्मसमाज इत्यादि नवनवे पंथ निघूं लागले आहेत, त्या पंथाचे लोक ख्रिस्ती लोकांप्रमाणें रूढ हिंदूधर्माची निंदा करितात, त्यामुळें लोकही त्यांचा द्वेष करितात. असो. सांगण्याचा मतलब इतकाच कीं हे पंथ निरानराळें उत्पन्न होऊन हिंदूधर्माचें खरें स्वरूप अगदीं लुप्त होऊन गेलें आहे. जराग्रस्त मनुष्याला ज्याप्रमाणें अनेक व्याधी उत्पन्न होऊन तो त्यांनीं पीडलेला असतो, त्याप्रमाणें आमच्या हिंदू धर्माची अवस्था झाली आहे हे वेगवेगळे पंथ जळवांप्रमाणें त्याचें जीवित शोषून घेत आहेत. हिंदुधर्माभिमान्यांनीं या गोष्टीचा शांतपणें विचार करून वेळप्रमाणें वागून सुधारकांस सवडी अथवा पाठबळ द्यावें, अशी त्यांस आमची करद्वय जोडून मनोभावें विनंती आहे. येणेंकरून ते आपली, आपल्या देशाची व आपल्या धर्माची अब्रू राखतील व देश व धर्म रसातळास न जातां वर डोकें करूं लागेल.

सतां, हरएक वेळीं धर्म नडतो आहे, तरी आमचे डोळे उ-
घडूं नयेत, यापरतें आश्चर्य तें कोणतें ? जीवनार्थ कलहांत
जर आम्ही रसातळास गेलों, तर या भूतलावर जीं कांहीं
सात आश्चर्यें आहेत त्यांत हें एक आठवें सामील होऊन
सर्वांच्यावर त्याची कडी होईल !

ज्याला सारासारविचार नाहीं, दूरदर्शित्व नाहीं, विचार-
क्षमत्व नाहीं, स्वहितत्यागबुद्धि नाहीं, त्याच्या नेत्रांवर दु-
रभिमानाचीं, अथवा दुराग्रहाचीं पटलें आलीं असल्यामुळें
त्याला स्वतः शिवाय इतर सर्वत्र आंधळेपणा आलेला दि-
सतो असलीं माणसें बोलून चालून अज्ञच. त्यांच्या बड-
बडण्याकडे थोरांनीं लक्ष कशास द्यावें? परंतु ज्ञानदीप हातीं
लागल्यामुळें ज्यांच्या मार्गावरील अंधार नाहींसा होऊन
खड्डयांत, कांव्याकुंपणांत पडण्याची भीति ज्यांचा नाहींशी
झाली आहे, त्यांनीं ज्ञानलवदुर्विदग्ध जनांस आपल्या र-
स्त्यानें येण्यास सांगावें, त्यांची समजूत घालावी, त्यांची वि
नंती करावी, आणि त्यांचा पुढील कांव्या कुंपणांत पडण्याचा
प्रसंग टाळला पाहिजे. अज्ञजन वाटेल तें बडबडोत, आपली
थट्टा करोत, आपणांस शिव्यागाळी देवोत मारावयास येवोत
अथवा खरोखर मारोत, परंतु त्यांस आज्ञानतमांतून काढू-
न ज्ञानरवीच्या लखलखीत प्रकाशांत आणून सोडण्याचा
जो आपला हेतू, अथवा आपलें कर्तव्य, तो हेतू साधण्यास

अथवा तें कर्तव्य बजाविण्यास बिलकुल माघार घेतां कामा नये साधू येशू ख्रिस्तानें जसें ह्मटलें, कीं 'पाप्यांनो, तुह्मी मजकडे या, मला तुमची कींव येते, मी तुमचें तारण करितों,' तसेंच आपल्या मनाची शांती, समता, सहनशीलत्व, परोपकारित्व, दयाभूतत्व, निरपेक्षबुद्धि इत्यादि सद्गुण बिलकूल ढळूं न देतां याच तेजस्वी शस्त्रांनीं अज्ञान, दुरभिमान, दुराग्रह इत्यादि भयंकर रिपूंशीं युद्ध खेळून सुधारकवीरांनीं जय मिळविला पाहिजे*. अज्ञजनाप्रमाणें कायद्यांची, अपशब्दांची

---

* समर्थांनीं आपल्या दासबोधांत पंधराव्या दशकांतील 'चातुर्यलक्षण निरुपणांत' जें ह्मटलें आहे तें सर्व सुधारकांनीं नेहमीं लक्षांत ठेवण्यासारखें आहे. ते ह्मणतातः—वेडे करावे शहाणे॥ तरीच जिणें श्लाघ्यवाणें॥ उगेच वादांग वाढविणें ॥ हें मूर्खपण॥१५॥ मिळोन जाऊन मिळवावें ॥ पदी घेऊन उलथावें ॥ कांहींच कळों न द्यावें ॥ विवेकबळें ॥ ॥१६॥ दुसऱ्याचे चालीं चालावें ॥ दुसऱ्याचें बोलणीं बोलावें ॥ दुसऱ्याच्या मनोगतें जावें ॥ मिळोनिया ॥ १७ ॥ जो दुसऱ्याचे या हितावरी ॥ तो विपट कांहींच न करी ॥ मानत मानत विवरी ॥ अंतर तयाचें ॥ १८ ॥ आधीं अंतर हातीं घ्यावें ॥ मग हळू हळू उकलावें ॥ नाना उपायें न्यावें ॥ परलोकासी ॥१९॥ हेकाडास हेकड मिळाला ॥ तेथें गलबलाचि झाला ॥ कलह उठतां चातुर्याला ॥ ठाव कैचा ॥२०॥ उगीच करिती बडबड ॥ परि करून दाखविणें अवघड ॥ परस्थळ साधणें जड ॥ कठिण आहे ॥ २१ ॥ धके चपेटे सोसावे ॥ नीच शब्द सोशीत जावे ॥ पस्तावोन परावे ॥ आपुले होती ॥ २२ ॥

अथवा लोखंडाचीं शस्त्रें उपसतां कामा नये. सुधारणादेवीचे आह्मीं प्रेषित अहों, असें समजून जें महत्कार्य साधण्याचें आहे, त्याकरितां काया, वाचा, मनें करून झटलें पाहिजे. अज्ञजनाप्रमाणें क्रोधादी दुष्ट विकारांस जर सुधारक वश झाले, तर त्यांच्यांत व इतरांत तफावत ती काय राहीली? मग ते सुधारणा देवीचें दूतत्व करण्यास योग्य कसे ह्मणावेत? व त्यांची संकटाची, जडजोखिमाची मोहीम तडीस जावी तरी कशी? व लोकांचीं मनें वश करून त्यांस सुधारणा देवीचे भक्त ते बनवितील कसे? इत्यादि शंका तात्काळ मनामध्यें मुर्तिमंत उभ्या राहतात. सुधारकांचें अंतर्बाह्य वर्तन अगदीं धुतल्या तांदुळासारखें निर्मळ असलें पाहिजे; सत्यप्रीयता, शांती, क्षमा, दया इत्यादि सद्गुणांनीं ते ओथंबलेले असले पाहिजेत; ह्या गुणांचें तेज खालीं सांडत आहे, असें त्यांच्या मुखश्रीवरून दिसलें पाहिजे; मग त्यांना शिष्यमंडळी मिळण्यास अवकाश कशास पाहिजे? मग आषाढी कार्तिकीच्या सारखे गांवोगांवचे, प्रांतोप्रांतीचे देशोदेशीचे थवेच्या थवे दिङ्मापताका घे घेऊन येतील.

---

ह्या उपदेशाची सुधारकांनीं रोज पारायणें करावींत असें आह्मांस वाटतें. अज्ञजनांच्या हृदयांतील दुराग्रह, दुरभिमान इत्यादि दुसाध्य गड स्वाधीन करून घेण्यास समर्थांनीं ही त्यास गुरूकिल्लीच दिली आहे.

असो. मनुष्य उन्नतावस्थेस कोणत्या गुणांनीं पोंहचतो, त्यानें आपणांस सुस्थिती प्राप्तकरून घेण्यास काय केलें पाहिजे, दुर्गुणांचा व दुराचाराचा त्याग कसा केला पाहिजे, इत्यादि सांगतांना त्यास फार प्रेमळपणानें व मुद्देसूत सांगितलें तर तो मन लावून ऐकेल, आणि तसें वागण्याचा प्रयत्न करील, परंतु तेच त्याचे घातकी रूढाचार त्यास समजावितांना त्याची थट्टा किंवा निर्भत्सना आरंभिली तर त्यास वाईट वाटून तो तेथून निघून जाईल, आणि समयविशेषीं सांगणारांचा मनांत द्वेष वाणील. तरवारीपेक्षां गोड जिभेनें जास्ती पराक्रम केला आहे, हें आज नव्यानें येथें सांगितलें पाहिजे असें नाहीं. हल्लींचा शांततेचा काळ समाजसुधारणा व धर्मसुधारणा करण्यास फार अनुकूळ आहे. या वेळांत सुधारक वीरांच्या मोहिमेवर मोहिमीं धडकल्या पाहिजेत. आतां उतावळे सुधारक व थंड सुधारक, याची वाटाघाट करण्यांत वेळ गमाविणें, ह्यासारखा दुसरा मूर्खपणा नाहीं. जे कोणी थंडे सुधारक असतील, त्यांनीं असें समजावें कीं, कालगती बरोबर होणाऱ्या सुधारणेवर जर त्यांची सारी भिस्त असेल, तर सुधारक हें विशेषण त्यांनीं आपणांस जें लावून घेतलें आहे, तें निरर्थक आहे. सुधारणा शकटास जर त्यांजकडून गति मिळत नाहीं, तर त्यांस थंडे ह्मणण्यापेक्षां लोक निर्जीव सुधारक अथवा काळवादी

दैववादी असें मात्र ह्मणतील. आमच्या हिंदूसमाजाइतका मट्ठ समाज साऱ्या दुनियेंत सांपडणार नाहीं. त्याच्या मागें नेहमीं अरी लावून त्यास जागृत ठेविलें पाहिजे. नाहींतर तो हळूहळू अधोगतीसच जाणार. 'राजा कालस्य कारणं,' 'यथा राजा तथा प्रजा.' असलीं मतें आमच्या लोकांचीं ठाम बनून गेलीं आहेत. राज्यसुधारणा, समाजसुधारणा, धर्मसुधारणा, याजकरितां लोकांची जूट, सभा, चळवळी, दंगे, फिसालती झालेल्या कधींच पाहण्यांत नाहींत किंवा ऐकण्यांत नाहींत. राजानें अज्ञ मुलांप्रमाणें आमची सर्वस्वी काळजी घेतली पाहिजे. परवांचा संमत्तीवयाचा कायदा जर सरकारानें घडला नसता, तर आह्मी होऊन कधींच मागण्यास गेलों नसतों. मुलाचें दुखणें बरें व्हावें ह्मणून त्यास औषध घेण्यास सांगितलें, तर तो आपखुषीनें कधींच घेणार नाहीं; त्यास आडवें पाडून हातपाय धरून जबरदस्तीनें पाजावें लागतें. तसेंच आमच्या सुधारणेकरितां सरकारानें बळेंच आमच्यावर वरच्या सारखे कायदे लादले पाहिजेत.तेव्हांच कायते आह्मी सुधारलों तर सुधारूं. नाहींपेक्षां, आमचे आह्मी वर डोकें काढण्यास कधींच धडपड करणार नाहीं. त्या राष्ट्रीयसभेला बिचाऱ्या ह्यूमसाहेबाचा आधार आहे, म्हणून कशी बशी तरी चालली आहे. जर कां त्यानें आपलें अंग काढून घेतलें

तर बिचारी रसातळास गेलीच ह्मणून समजावें. अशी जर आमची स्थिती आहे, तर आमच्या बऱ्याकरितां कायदे सरकारानें करावेत, अशी भीक त्याजपाशीं कां मागूं नये ? हें आह्मांस समजत नाहीं. परंतु, आपली निर्बलता, व आपला मूर्खपणा झांकण्याकरितां आपले आपण प्रयत्न करणें हें रास्त आहे. एवढ्यासाठींच रात्रंदिवस कानीं कपाळीं ओरडण्याचें कीं, आपलें दोषाविष्करण दुसऱ्यांकडून करवून घेऊं नका, आमच्या जगद्गुरूस बाजूस ठेवून आमच्या समाजसुधारणेचे, धर्मसुधारणेचे, कायदे सरकारानें आह्मांस द्यावेत, अशी वेळ आणूं नका; कूपमण्डुकन्यायानें तुमच्या स्थितीचा विचार करूं नका; आपल्या चारीबाजूंस दूरवर नजर फेंका; चीन जपानच्या स्थितीचें पर्यालोचन करा, ब्राह्मण श्रेष्ठ व कुळंबी नीच असल्या आत्मघातकी विचारांस आपल्या अंतःकरणांत आश्रय देऊं नका; तुह्मी ब्राह्मण म्हणजे देशरुपी शरीराचें डोकें, असा जर तुमचा समज असेल तर अशी कांहीं एखादी अजब युक्ति काढा कीं, गतवैभव पुनश्च पुर्वाश्रमाकडे डोकावूं लागेल, आपसांतील वैमनस्यें, कलह नाहींसें होतील, सर्वत्र समानभाव वाढून परस्परांत सलोखा वाढेल, आणि एक दिलानें सार्वजनिक कामें उठलीं जातील. पण असें होण्यास डोकें मात्र ताळ्यावर ठेविलें पाहिजे. मत्सर,

द्वेषबुद्धि, स्वार्थपरायणता इत्यादि विकारांनीं डोक्यास भ्रमूं देऊं नका, म्हणजे झालें.

इंग्रेजींत अशी एक म्हण आहे कीं, ' शरिरांत रोगाचा पुरा अंमल होऊं देऊन मग बरें होण्याकरितां इलाज करीत बसण्याचें, त्यापेक्षां रोगाचा प्रवेश होत नांच त्याला अटकाव करणें चांगलें.' आमच्या समाजास ही म्हण लागू करणें अत्यावश्य आहे. पण तो समाज अगोदरच अनेक आधिव्याधि उपाधींनीं रोगग्रस्त होऊन सडून कुजून गेला आहे. इतरांस त्याच्याजवळ येण्यास किळस वाटतो. कोणी कोणी तर त्याची आशाच सोडली आहे. परंतु कित्येक दूरदर्शी, दर्दी व दृढनिश्चयी धन्वंतरी त्यास बरा करूं ह्मणून छातीला हात लावून सांगत आहेत ! पहावें काय होतें तें! या धन्वंतऱ्यांनीं आपलें कमिशन भरवून निदान ठरवून एकेक दोषाचा परिहार करूं लागल्यास काळांतरानें समाजाची प्रकृती ताळ्यावर येण्याचा संभवही आहे! काय नेम सांगावा? कोणी म्हणतात, कीं समाजाची इमारत फारच जुनाट झाल्यामुळें जीर्ण होऊन गेली आहे, तिचीं जुनीं बंधनें गळून पडण्याच्या बेतांत आहेत; तर तीं टाकून देऊन नवीं घेतलीं पाहिजेत. अनेक वावटळांचे तडाखे खाल्यामुळें इमारत फारच झुकून गेली आहे. तिला ग्रामण्य किंवा बहिष्कारांसारख्या काड्यांचे धिरे देऊन ती

तगावयाची नाहीं. विधवाविवाहप्रचार, लोकशिक्षणप्रसार, जातीभेदखंडन, असलीं दांडगीं खैरीं खुंटें जर लावलीं, तर ती इमारत वास्तव्यास बरी होईल. पण जीर्ण झालेल्या वस्त्रास ठिगळें देऊन काय उपयोग? तें टाकून देऊन जसें दुसरें घ्यावें लागतें, तसेंच पुनरपि समाजाची इमारत कोरीकरकरीत होण्याकरितां नवी धर्मसंस्थापना होऊन समाजास नव्या बंधनाचा आळा घातला पाहिजे. नवा धर्म म्हटला, म्हणजे लोकांस मोठा बाऊ वाटतो. त्यांत काय आहे, काय नाहीं, हें नीटपणें समजून न घेतां उगाच आरडा करून पळत सुटतात ज्या श्रुतिस्मृतींच्या बंधनांनीं आज आपण बांधलेले आहों त्या ज्या काळीं लिहिल्या गेल्या, त्याकाळीं आज आमचें हें भरतवर्ष यवनांच्या ताब्यांत जाईल; आह्मी अग्निरथांत व अग्निनौकेंत बसून प्रवास करूं; व्यापार, शेती, नोकऱ्या चाकऱ्या इत्यादि धंदे ब्राह्मण करूं लागतील; असल्या गोष्टी त्या लेखक ऋषींच्या स्वप्नांत तरी आल्या असतील काय? जर इतक्या जुन्या काळचीं शास्त्रें आह्मांस आज लागू पडतात तर आजपासून पुढें दोन चार हजार वर्षांनीं होणाऱ्या प्रजेकरतां आज जर आह्मी शास्त्रें घडवून टेविलीं, तर वावगें होईल काय? याचें उत्तर काय देतां येईल? जीर्ण झालेलीं बंधनें (दोऱ्या) कितीही बेतावातानें व जपून वा

परलीं, तथापि तीं आपोआपच तुटून गळून पडतील. याचा आमच्या सुशिक्षितांनीं शांतपणें व हरघडी विचार केला पाहिजे. कारण आमचा सर्वस्वी आधार त्यांजवर आहे.

असो. करसनदास यांनीं काळाचा भरंवसा धरून जर हातपाय हालविले नसते, तर करसनदास या नांवाचे जसे आजपर्यंत हजारो लोक कोनाकोपऱ्यांत मरून गेले असतील, तशीच यांचीही अवस्था होऊन जाती. परंतु त्यांनीं काळावर विश्वास ठेविला नाहीं; निर्भयांतःकरणानें सत्याची बाजू संभाळून धरली; त्यांत शेंकडों हजारों संकटें आलीं तरी न भितां त्यांनीं त्यांशीं टक्कर दिली म्हणूनच ते आज लोकमान्यतेस पात्र होऊन बसले आहेत; त्यांस कीर्ति मंदिरांत उच्चस्थानीं जागा मिळाली आहे; त्यांचें चरित्र गाण्यांत विद्वानांस आनंद वाटत आहे; व त्यांनीं पुढील पिढीस यशसंपादनाचा मार्ग दाखवून दिला आहे.

या लायबेल केसचा निकाल लागल्यावर करसनदास यांची इतकी कांहीं प्रतिष्ठा वाढली कीं, रावसाहेब महिपतराम रुपराम यांनीं त्यांच्या चरित्रांत बेधडक असें लिहिलें आहे कीं, जर करसनदास यांनीं त्यावेळीं नवा धर्मपंथ काढला असता, तर त्यांस पुष्कळ अनुयायी मिळाले असते. इतकी योग्यता प्राप्त झाल्यावर साधारण प्रकृतीचा

मनुष्य आढ्यतेंत गर्क होऊन आपल्या आयुष्याचे बाकीचे दिवस स्वस्थ बसून अहंपणांत घालविता. परंतु करसनदास यांस जसजसे प्रसंग येत गेले, तसतसें त्यांच्या आंगचें धैर्य, उत्साह, उद्योगशीलता, इत्यादि गुण जास्ती जास्ती प्रगट होऊं लागले. या गोष्टीची पुढील हकिकत साक्ष देईल.

सन १८६३ सालीं अमेरिकेच्या संयुक्त संस्थानांतील दक्षिण व उत्तर संस्थानें यांच्यांत गुलामांच्या व्यापारासंबंधानें युद्ध माजलें. तेणेंकरून देशांत अस्वस्थता होऊन शेतकी व्यापार वगैरे श्रेष्ठ धंदे बंद पडले; आणि इंग्लंडास जो तिकडून कापसाचा पुरवठा होत होता तो एकदम नाहींसा होऊन साऱ्या ल्यांकेशायर प्रांतांत गिरण्या बंद पडण्याची वेळ आली; त्यामुळें हजारो लोकांचा उद्योग सुटून त्यांस अन्नान्नदशा प्राप्त झाली. हें संकट टाळण्याकरितां गिरण्यांचे मालक हिंदुस्थानांत कापसाच्या वरचेवर मागण्या करूं लागले, त्यामुळें बाजारांत कापसाची चणचण झाली. कापसाचा भाव एकदम भलताच्या भलताच वाढून हजारो लोकांस फायदा झाला. त्यावेळीं मुंबई शुद्ध कुबेरपुरी झाली होती. विद्यासंपन्न व्यापारी लोकांस धोरण जास्ती राहून इतर साधारण सट्टे वगैरे करणाऱ्यांपेक्षां ते एकदम साधारण स्थितींतून लक्षाधीश कोट्याधीश बनून गेले. त्यांत शेट प्रेमचंद रायचंद

यांजवर तर लक्ष्मी मोहित होऊन तिनें त्यांच्या गळ्यांत माळच घातली, असें लोक ह्मणूं लागले. या शेटजींची बुद्धि, स्मरणशक्ति, नम्रता, उदारता, आर्जवशक्ति आणि हरतऱ्हेनें लोकांचीं मनें हरण करण्याचें सामर्थ्य, हें कांहीं असाधारण आणि उदाहरणीय होतें. यांच्याचप्रमाणें विद्वान करसनदास माधवदास रंकाचे राव झाले. हेही शेट प्रामाणिक,उदार, तसेच गुणज्ञ व शिवाय सत्कृत्यास साह्य करणार, अशी त्यांची कीर्ति होती व ते साहसी पण होते. त्यांनीं त्या वेळेस विलायतेस पेढी स्थापन करण्याचा विचार केला व पेढीचे मुख्य मुनीम ह्मणून रावबहादूर रामचंद्र बाळकृष्ण यांस नेमून करसनदास मुळजी यांस त्यांच्या हाताखालीं मदतनीस ह्मणून काम करण्यास नेमिलें यांत असा ठराव होता कीं, पेढींत नफा झाल्यास करसनदास यांस त्यापैकीं दोन आणे भाग देण्याचा; व नुकसान झाल्यास ते भागीदार नाहींत. शिवाय विलायतेस जाण्या येण्याचा खर्च व विलायतेंतील भोजनखर्च हा पेढीच्या मालकांनीं देऊन करसनदास यांस शिवाय दोनशें रुपयेप्रमाणें दरमहा ठरविला. इतकेंच करून शेट करसनदास माधवदास राहिले नाहींत. तर सन १८५८ सालीं करसनदास मुळजींनीं मुंबईत चिनी कापडाचें दुकान घातलें होतें, त्यास पन्नास हजार रुपये कर्जाऊ दिले; व तो व्यापार वाढविण्यास एक

लाख रुपयेपर्यंत रक्कम देण्याचें वचन देऊन सर्वांत मोठें थोरलें अभिवचन हें दिलें कीं, तुह्मी विलायतेहून आल्यावर आह्मी तुमच्याशीं पंक्तिव्यवहार करूं. हें शेवटलें वचन मिळाल्यामुळें करसनदास यांच्या मनांत भीति कशी ती लवलेश राहिली नाहीं.

करसनदास यांस विलायतेस जाण्यास ज्या सवडी शेट करसनदास माधवदास यांनीं करून दिल्या, त्यांवरून हल्लीं सहज कोणी असें ह्मणेल कीं, इतकी अनुकूलता, इतकें साधन व इतकी लालूच असल्यावर कोणीही विलायतेस जाईल, त्यांत करसनदास यांचें धैर्य तें काय प्रगट झालें? व त्यांची इतकी तारीफ ती कशाला पाहिजे? यास उत्तर ह्मणून इतकेंच कीं, प्रस्तुतच्या स्थितीचें साम्य मागल्या तीस वर्षांवर जी स्थिती होती, तिशीं करून पहा; ह्मणजे करसनदास प्रशंसेस पात्र आहेत, किंवा नाहींत, याविषयीं तुमची खात्री होईल. त्यावेळीं धर्मशास्त्राच्या कलमांचें रूप फारच जाज्वल्य व भयंकर होतें. हल्लींच्या सारखी धर्मांत शिथिलता वगैरे नव्हती. विधवाविवाह, द्विपांतर गमन, मूर्तिपूजानिषेध इत्यादि सुधारणेच्या गोष्टींबद्दल साधारण लोकांस लिहिणें, बोलणें, वाचणें, चर्चा करणें, या गोष्टी केवळ बाऊ वाटत होत्या, इतकेंच नाहीं, तर त्यांबद्दल ब्र काढण्यासही कोणाची छाती होत नसे. डाक्टराचें औषध

कोणी घेतलें, तर साधारण प्रायश्चित्त घेऊन जानवें बदलावें लागत असे; आगगाडींतून आलेल्यास सचैलस्नान करावें लागून पागोटें रात्रभर कौलारावर ठेवावें लागे; नळाचें पाणी पिण्यांतसुद्धां धर्मशास्त्ररूपी पिनलकोडाच्या कलमाचें उल्लंघन होत असे; मग सोडावाटरची बाटली हातीं धरण्यास कोणाची माय व्याली होती ? ज्यांत धर्मशास्त्राचा संबंध नाहीं, असें जें स्त्रीशिक्षण, त्याचें नुसतें नांव उच्चारणेंही लोकांस खपत नसे; वेदमंत्र ऐकण्यास देखील ब्राह्मणेतर अपात्र होते. अशा वेळीं विलायतेस जाणें, आणि आतां पुरुषच काय, पण स्त्रियाही विलायतेस व अमेरिकेस जाऊ लागल्या आहेत; विधवाविवाह अशास्त्र ( १ ) असूनही

१ असा धर्मलंड गोंधळ चालला असून बहिष्कारार्थ म्हणून एकही सभा भरलेली ऐकण्यांत नाहीं. कांहीं धर्माभिमानी म्हणविणारे वेदशास्त्रशून्य, ब्राह्मणब्रुवः अशांनीं चहा बिस्कुटाच्या पार्टीकरितां ग्रामण्याची चळवळ सुरु केली आहे. पण ते असें समजत नाहींत कीं, आपण घोडीं व गाढवें एकाच काठीनें हांकीत आहों, व भाजी व खाज्या एकाच भावानें विकीत आहों, व अभक्ष्यभक्षण, व अपेयपानाच्या प्रतिबंधाबरोबर दुसऱ्यांही कांहीं हितकर गोष्टींस प्रतिबंध करीत आहों. जशीं कामांध प्रेमांध वगैरे माणसें असतात, तशी आमची पुणेकर धर्माभिमानी मंडळी धर्ममदांध झाली आहे ! ठीकच आहे, दिवा जातांना मोठा होत असतो !

आतां बरेच होत असलेले ऐकूं येत आहेत; महादेवाच्या व विठोबाच्या देवळा शेजारीं एकेश्वरी मतांच्या लोकांचीं प्रार्थनामंदिरें व पाद्र्यांचीं देवळें उभीं झालीं आहेत; मुलीं-च्या शाळाचशा काय, पण हायस्कुलें व कालेजें स्थापन हो-ऊन स्त्रिया बि. ए. एम. ए. होऊं लागल्या आहेत; डाक्ट-रांचें औषध व सोडावाटर यांची काय मोठी विशाद? ब्रांडी सारख्या सुराबाईची आचारी, पाणके, व अर्धबोबडे शिकलेले यांजवर कृपादृष्टी झालेली पुण्यासारख्या ब्राह्म-णी पवित्र शहरांत नित्यशः दृष्टीस पडूं लागली आहे; आ-गगाडी व आगबोट ह्मातारी ( जुनी फार दिवसांची ) झाली व त्यामुळें त्यांचा विटाळ गेला; आणि पारशी, मु-सलमान, शुद्र अतिशूद्र यांच्या शेजारीं बसून दशम्या-लाडू, फोडणीचे पोहे, इत्यादि खाण्यास हरकत नाहींशी होत चालली आहे; वेदग्रंथ छापले जाऊन हरकोणास प्राप्य झाले आहेत; अशा वेळीं विलायतेस जाणें, यांत फार अंतर आहे! शिवाय महाराष्ट्रांत समाजव्यवस्थेच्या नांवानें आंवळ्या एवढें आहे; कोणाचा पायपोस कोणाच्या पायांत नाहीं, तशी स्थिति गुजराथेंत नाहीं. तेथें प्रत्येक जा-तींत पंच व महाजन लोक आहेत; त्यांचा दरारा व वर्चस्व सर्वांवर असतें; त्यांची हेंटाळणी करितां येत नाहीं; ते ह्मणतील तर एखाद्याला रसातळास पोंचवितील, अथवा एकाद्याला

गो २ ८४१४१ ८८ १४८

श्रेष्ठपदीं बसवितील. असें असून करसनदास यांनीं विलायतेस जाण्याचा जो निश्चय केला, त्याजवरून ते असाधारण धैर्याचे पुरुष होते. असें ह्मणण्यास बिकूल प्रत्यवाय नाहीं, आणि ह्मणूनच ते सर्वांच्या प्रशंसेस पात्र झाले आहेत; असें आमचें ह्मणणें आहे.

असो; वर सांगितल्याप्रमाणें सर्व बेत होऊन तारीख १३ माहे मार्च सन १८६३ इसवी रोजीं करसनदास विलायतेस जाण्यास निघाले. त्या वेळीं बुद्धिवर्धक सभेकडून मानपत्र, खोजे मंडळीचें मानपत्र व एकहजार रुपयांची भेट, आणि मुंबईतील वर्तमानपत्रकारांचें मानपत्र, इतकें त्यांस बंदरावर बहुमानपूर्वक देण्यांत आलें. प्रयाण दिवसाच्या अगोदर एक दोन ठिकाणीं सभा भरून मोठमोठ्यांनीं करसनदास यांस पानसुपारीस बोलाविलें होतें, तेथें त्यांच्या स्तुतीपर अनेक भाषणें झालीं, आणि लोकांनीं वर्गणीनें आठहजार रुपयांची रक्कम गोळा करून त्यांच्या कुटुंबास भेट ह्मणून दिली. आगबोटींत बसण्याच्या दिवशीं पालवा बंदरावरील सारी मोकळी जागा गाड्यांनीं व माणसांनीं गच्च भरून गेली होती, नाना वर्णांचे लोक त्या समयीं हजर होते, आणि जातेवेळीं सर्वत्रांनीं आनंदप्रदर्शक जयजयकार करून त्यांना निरोप दिला. त्याच आगबोटींत रावबहादूर रामचंद्र बाळकृष्ण, वासुदेव बाबाजी

नवरंगे, मनोरदास रूपजी आणि चार चाकर मिळून सात आठ देशी मनुष्यांची सोबत होती.

विलायतेस दोन वर्षे रहाण्याच्या ठरावानें करसनदास गेले होते, परंतु त्यांस फुप्पुसाचा रोग असल्यामुळें डाक्टरांनीं हिंवाळ्याकरितां स्वदेशीं परत जाण्यास मसलत दिली. कारण, विलायतेंतील हिंवाळा फार कडक; ह्मणून विलायतेस फक्त सात महिने राहून ते मुंबईस परत आले. या प्रवासामुळें त्यांची प्रकृती सुधारली, व त्याबरोबर ज्ञानाचीही वृद्धि झाली, हें कांहीं निराळें सांगणें नको

कसरनदास मुंबई बंदरांत जेव्हां दाखल झाले, तेव्हां जे लोक त्यांस प्रथम निरोप देण्याच्यावेळीं जयजयकार करण्यास गेले होते, ते सर्व यावेळीं कोना कोपऱ्यांत दडून बसले. स्वागताकरितां कोणीं गेलें नाहीं. पहिल्या दिवशीं शेट प्राणजीवनदास वाघजी यांनीं आपल्या घरीं त्यांस जेवावयास नेलें. बहुतेक मंडळी दूर दूर करूं लागली. फारच झालें तर नव्या सुधारलेल्या रितीप्रमाणें ' मी फार दिलगीर आहे, ' म्हणून बोळवणी करावी. सर्व कपोल जातीच्या लोकांनीं व महाजनमंडळींनीं त्यांजबरोबर अन्नपानादि व्यवहार बंद केला. घरीं चाकर मिळण्याचीही मुष्कील पडली. सर मंगळदास नथुभाई यांनीं प्रथमच विलायतेस न जाण्याबद्दल करसनदास यांस समजावून सां-

गितलें होतें सबब त्यांजकडून साह्य मागतां येईना. करसनदास माधवदास यांनीं दिलेलें वचन पाळलें. हे जातीचे नागरवाणी होते व आपल्या उर्जीतदशेंत स्वज्ञातीच्या गरीबागुरिबांवर बरेच उपकार त्यांनीं केले असल्यामुळें त्यांच्या पक्षांत बरेच लोक होते. शिवाय नगरशेट प्रेमाभाईचे मुनीम वीरचंद दीपचंद हेही नव्या मताचे असल्यामुळें शिकलेल्या लोकांस वर डोकें काढण्यास त्यांनीं उदार अंतःकरणानें साह्य केलें होतें, त्यांसही येथें विसरतां कामा नये. शिवाय त्यांनीं आपल्या स्नेहीसंबंधपैकीं कित्येक गृहस्थांसमवेत करसनदास मुळजी बरोबर पंक्तिभोजन केलें, परंतु महाजन मंडळी मिळून तिनें या गृहस्थास व सर्व नागर वाण्यांच्या जातीस बहिष्कृत केलें पुढें कांहिंका वर्षांनीं त्या बहिष्काराचें सारवण आपोआप उडून पुनः ‘ सर्वः कालवशेन नश्यति ’ या सिद्धांताप्रमाणें पूर्ववत् स्थिति झाली.

असो; इसवीसन १८६३।६४ ते १८६५।६६ या दोन तीन वर्षांत त्या मुंबईला जें रूप आलें होतें त्याला कोणती उपमा साजेल हें निश्चयात्मक सांगवत नाहीं! तिला सोन्याची लंका ह्मणावें! किंवा श्रीकृष्णानें सुदामजीला दिलेली सोन्याची नगरी ह्मणावें! किंवा स्वप्नसृष्टींत रचलेली नगरी ह्मणावें! काय ह्मणावें तरी काय? अशी त्यावेळीं स्थिति झाली होती. लोकांच्या घरीं असलेल्या तांब्याची चांदी

व चांदीचें सोनें बनून गेलें. असा किमया त्या वेळीं कापसाच्या आणि शेराच्या व्यापारानें जागविला होता. ही स्थिति देशावर कापूस पिकणाऱ्या प्रांतांतही होती. तेथें शेतकरी मगरमस्त झाले होते. त्यांच्या घरांत लक्ष्मी माईनाशी झाली. ऐकण्यांत असें आहे कीं, धारवाडाकडे कोणी एका शेतकऱ्यानें गाडीच्या चाकांच्या धांवा मौजेनें रुप्याच्या करून बसविल्या होत्या. लोकांनीं घरच्या गाद्या, लेपें, तक्के, फाडफाडून कापूस विकला. दोनचार सालांत कापसाची लागवड दुपटीच्या जवळ जवळ आली. एका गुजराथी कवितेंत त्यावेळची स्थिति यथार्थ वर्णिली आहे; ती अशी.

कवित छंद.

लुंडी जेवि लाडिओ । ते हवेलीमां लेडी थई ॥
रू देवीये रुडुं किधूं । भोग आप्या भावता ॥
जे पीठि मोटिया हता । ते मोतियावाला थया ॥
रती सोनूंनादिठेलूं । ( ते ) रतले तोलांवता ॥
वेलगाडी भारे भरे । तेतो घोडा गाडीं चढे ॥
रेन सुखेन सुता । ते रेन हात राखतां ॥
चेतो चंचल सौ । जळ त्यां पळमांस्थळ ॥
करे एवा ईशने । नित्यरो संभारता ॥

अर्थः-लंवड्यासारख्या नीच लाड्या त्या लेड्या होऊन हवेलींत वसूं लागल्या. रू ( कापूस ) देवी प्रसन्न होऊन तिनें सर्वांस इष्ट वस्तू मिळवून दिली. जे पाठीवर मोटा ( हेल ) वाहत होते, ते मोती वाहू लागले, ( मोतीवाले झाले ). ज्यांनीं सोनें कधीं रतिभारसुद्धां पाहिलें नाहीं, ते रतलानें सोनें तोलू लागले. ज्यांनीं बैलाच्या ओझ्याच्या गाड्या भरून वाहव्यात ते घोड्याचया गाडींत बसून फिरू लागले. ज्यांना रात्रौ दरिद्रावस्थेमुळें सुखानें निद्रा मिळत नसे, त्यांच्या हातांत घोड्याच्या रेनी ( लगामी ) आल्या, ( घोडे बसण्यास मिळाले ). अशी स्थिति झाली आहे, ह्मणून सुज्ञजनहो, तुह्मी सावध व्हा; आणि निमिषमात्रांत जळाच्या ठिकाणीं स्थळ करणारा जो ईश्वर त्याचें नित्य स्मरण करा. ( या कवितेंत शब्दश्लेष पुष्कळ आहे. )

एका कवीनें ह्मटलें आहेः-

दोहरा.

**काल कुटिल ते पलटके शुंभ होगये शूर ॥**
**शहाजादे सोंधे भये मोंघे भये मजूर ॥**

अर्थः-काळ जो कुटिल आहे, तो उलटला. त्यामुळें झालें काय? तर शुंभ ( बावळे ) लोक शूर झाले, शहाजादे ( बाजिराव ) स्वस्त होऊन मजूर महाग झाले. ही

स्थिती त्यावेळीं मुंबईची झाली होती. जानू हावऱ्याच्या यक्षिणीनें त्यावेळीं या शहराची उलटी कांडी फिरविली होती. असो; ह्या कापसाच्या व्यापारामुळें पैशाची रेल चेल झाली. त्यामुळें लोकांस स्वस्थ बसवेना. नवनव्या कंपन्या लोकांनीं उभारल्या आणि शेर ( भाग ) वाढविले. 'व्याकबे'चा खाडा भरून काढणारी एक कंपनी निघाली तिचे शेर सर्वत्रांनीं घेतले कामें धुम धडाक्यानें चाललीं होतीं, द्रव्यमदामुळें लोकांच्या दृष्टी मंदावल्या होत्या. त्यांनीं मागलें पुढलें धोरण ठेविलें नाहीं. ही स्थिति अक्षयीं चालेल, असें त्यांस वाटलें; परंतु अमेरिकेंतील लढाई बंद होऊन कापसाच्या भावांत एकाएकीं फेरबदल झाला, आणि कंपन्यांस नुकसान झालें. शेरांची किंमत उतरून लोक जसे घटकेंत रंकाचे राव झाले होते, तसेच पुनः बोलतां बोलतां रावाचे रंक होऊन बसले. हजारो लोक कपाळीं हात देऊन रडूं लागले. हजारों कुटुंबांच्या घरांदारांचें वाटोळें झालें. आमचे चरित्रनायक शेट करसनदास यांनींही शेराचा व्यापार थोडा बहुत केला होता; त्याप्रमाणें तेही इतरांबरोबर या कागदी गलबतांत बुडाले. सावकार दाराशीं येऊन बसले मग इकडे तिकडे कांहीं हातपाय हालवून आंवरासांवर केली.

विलायतेहून आल्यावर करसनदास व्यापारांत शिरले

खरे, पण त्यांनीं विद्यार्जनाचा धंदा सोडून दिला होता असें नाहीं. ज्यांस विद्यामृताचें व्यसन लागलें आहे, त्यांस इतर व्यसनांप्रमाणें तें आमरण सोडवत नाहीं! करसनदास यावेळीं ग्रंथरचना करून विद्यादेवीची सेवा करीत होते. वल्लभी पंथाचा इतिहास इंग्रेजींत लिहून तो छापविण्याचें काम विलायतेस सुरू केलें होतें. "नीतिवचन" नांवाचें पुस्तक यांनीं पूर्वीं प्रसिद्ध केलें होतें, त्याची द्वितीयावृत्ति काढली. हें पुस्तक इतक्या सुंदर व प्रेमळ भाषेंत लिहिलें आहे कीं, सहृदय वाचकांस वाचतांना खालीं ठेववतच नाहीं त्याच्या वाचनानें मनुष्यास ऐहिक आणि पारलौकिक सुख मिळवितां येईल. बाल्यावस्थेपासून वृद्धावस्थे पावेतों, गरिबापासून श्रीमंतापावेतों, सर्वत्रांस सर्व अवस्थेंत तें वाचनीय झालें आहे. याशिवाय 'इंग्लंदचा प्रवास' या नांवानें जें मोठें सचित्र, मनोरंजक, व सुबोध पुस्तक प्रसिद्ध आहे, त्याचीही रचना या वेळींच चालली होती.

यानंतर करसनदासजी यांस पुनः विलायतेस पर्यटण करण्याचा प्रसंग आला तो असाः—काठेवाडांत पालिटाण्याच्या डोंगरावर जैन धर्मी श्रावक लोकांचीं मोठमोठीं मंदिरें आहेत, त्यांत जैनांच्या तीर्थकारांच्या मूर्ती आहेत, व तेथें यात्रेकरितां सर्व भरतखंडांतील श्रावक लोक येतात. हे श्रावक लोक मोठे उद्योगी, साहसी आणि श्रीमंत असल्यामुळें

त्यांनीं आपली बरीच सत्ता त्या डोंगरावर चालविली होती. परंतु पालिठाण्याचे ठाकूर सूरसिंह आणि श्रावक लोक यांच्यांत कांहीं एका कामावरून वितुष्ट येऊन मोठें प्रकरण माजलें. त्याकामीं न्यायाकरितां विलायतेपर्यंत मजल पोचविण्यास श्रावक लोक तयार झाले; आणि शेट वीरचंद यांच्या सांगण्यावरून सर्व श्रावक लोकांनीं करसनदास यांस विलायतेस पाठविण्याचें ठराविलें, व करसनदासजीनींही तें कबूल केलें. ज्या कामाकरितां विलायतेस जावयाचें त्याची सांगोपांग माहिती मिळविण्याकरितां करसनदास यांस बहुतेक काठेवाड प्रांत फिरावा लागला. काठेवाडांत जातांना तेथील पोलिटिकल एजंट कर्नल किटिंज यांजवर नामदार गव्हरनर सर बार्टल फ्रियर यांचें शिफारसपत्र त्यांनीं घेतलें असावें, अशी अटकळ होते; कारण, तेथें गेल्यावर मेहेरबान किटिंज साहेबांनीं यांचें सन्मानपूर्वक आगतस्वागत केलें. आतां जेथें खुद्द पोलिटिकल एजंट साहेबांनीं यांची बडेजाव केली, तेथें इतर राजे रजवाड्यांकडून यांचा उत्कृष्ट मानमरातब राहिला असेल कीं नाहीं, याजबद्दल शंकाच नको. ते ज्या ज्या ठिकाणीं गेले, त्या त्या ठिकाणीं त्यांनीं अनेक विषयांवर भाषणें केलीं, आणि लोकांचें चित्त आपणांकडे वेधून टाकिलें. राजकोट येथील 'विद्यागुणप्रसारक' सभेंत 'सौराष्ट्रास सुधारण्याचे उपाय'

या विषयावर एक उत्कृष्ट भाषण केलें. सभेस त्यावेळीं एजंट साहेब बहादुरांचीही स्वारी आली होती. भाषणांत करसनदास असें ह्मणाले कीं, ‘ देशी राज्यें सुधारण्यास राजेरजवाड्यांची सभा स्थापन होणें अवश्य आहे ’ हें ऐकून एजंट साहेब हांसले, आणि ह्मणाले, ‘ असें जेव्हां होईल, तेव्हां आह्मांस या देशांत राहण्याची गरज रहाणार नाहीं !’ खरें आहे. या देशाच्या स्थितीवरून पाहतां प्रजेच्या ऐक्यापासून जितका सत्वर लाभ होण्याची आशा आहे, त्यापेक्षां आमचे राजे रजवाडे यांच्यांत ऐक्य झाल्यापासून त्वरित लाभाची आशा आहे. आमच्या राजेरजवाड्यांनीं विद्या शिकून अगोदर आपलीं मनें उदार, प्रगल्भ व सुसंस्कृत करून घेतलीं पाहिजेत. आपल्या मोठेपणाच्या व वैभवाच्या दिमाखांत व आळ्यतेंत त्यांनीं राहतां कामा नये. प्रजेकडून अभिवंदन करून घेण्यांत सर्वस्व मानून थोरवी मिरवितां कामा नये. आपल्या खाण्यापिण्याच्या, कपड्यालत्त्याच्या व ऐषआरामाच्या तजविजींत निमग्न होतां कामा नये. साधेपणा ठेविला पाहिजे. इंग्रेज अधिकारी इकडील प्रजेशीं मिळून मिसळून न वागतां तुटून वागतात, म्हणून त्यांचें अनुकरण आपणास करण्याचें नाहीं; कारण, परकी असून त्यांच्या मनांत सर्वदां आपण विद्येनें, ज्ञानानें, आचारविचारानें, हिंदू लोकांपेक्षां श्रेष्ठ

आहों. आपण जेतें व हिंदू जित आहेत, असे विचार वागून आम्हांत मिळून मिसळून वागण्यांत त्यांस हलकटपणा वाटतो. परंतु आपण एकाच आईचीं लेकरें व सुखदुःखाचे सारखे वांटेकरी आहों, असें आपण समजलें पाहिजे; व गरिबाच्या झोपडींत समाचारास गेलों असतां, आपण नीच कृत्य केलें, असें राजानें मानून उपयोगी नाहीं. राज्यांतील अगदीं गरिबाचा व माझा हक्क सारखा आहे, व प्रजेच्या पापपुण्याचे आपण धनी आहों, या गोष्टीचा विचार करून चाललें पाहिजे. लढाईत सेनापति जर शौर्य दाखवील, तर प्रत्येक शिपाई प्राण देण्यास तयार होईल. राजा जर गानतान नाटकें तमाशे, ऐषआराम यांत चकचूर होईल तर प्रजाही तोच कित्ता वळवील. पण, तोच राजा विद्यादान, लोककल्याण इत्यादि गोष्टींकडे लक्ष देईल तर प्रजाही त्याच वळणाची होऊन राजास राज्यभार वाहण्यास हात लावील, आणि राज्यान्तीं नरकवास आहे म्हणून म्हणतात, तो राजाच्या कपाळचा चुकेल. असो. यानंतर जानेवारी सन १८६७ इसवी महिन्यांत वेरावळ मुक्कामीं त्यांनीं एक उत्कृष्ट भाषण केलें. त्या समयीं जुनागडचे नबाब साहेब आपल्या कारभारी मंडळासुद्धां हजर होते, भाषण ऐकून नबाबसाहेब प्रसन्न झाले, व करसनदासजी यांस बहुमोल पोषाख दिला. तेथून नि-

घून काठेवाडांत ज्या ज्या ठिकाणीं आपल्या कामासंबंधीं माहिती मिळण्यासारखी होती त्या त्या ठिकाणीं फिरून माहितगारी करून घेऊन मुंबईस परत येऊन मार्च १८६७ इसवी महिन्यांत करसनदास यांनीं विलायतेस प्रयाण केलें. पण ते ज्या हेतूस्तव तिकडे गेले तो त्यांचा हेतू सिद्धीस गेला नाहीं.

ह्या दुसऱ्या वेळीं करसनदास विलायतेस असतांना, नामदार सर बार्टल फ्रियर यांस त्यांच्या एका मित्रानें नेऊन भेटविले. हे नामदार साहेब मुंबईस गव्हरनर असतांना डाक्टर विलसन साहेब यांनीं त्यांजला करसनदासजीविषयीं पुष्कळ माहीतगारी करून दिली होती, व नामदारांनींही त्यांजविषयीं बरेच ऐकल्यामुळें ते त्यांच्या माहितीचे झाले होते. असल्या मनुष्यास आपणांपासून कांहींतरी उपयोग व्हावा, व त्याच्या गुणाची बूज व्हावी, ह्मणून नामदारांनीं मुंबई कौन्सिलांतील आनरेबल एलीस साहेब बहादूर यांजवर एक पत्र लिहून करसनदासास दिलें. त्यांत त्यांनीं करसनदासाची इतकी कांहीं शिफारस केली होती कीं, एलिस साहेबांस यांचें कांहीं तरी हित करण्याशिवाय दुसरा मार्गच राहिला नाहीं. प्रसंगही अनुकूळ आला. कर्नेल किटिंग साहेब, ज्यांचें ह्मणणें असें होतें कीं, करसनदास याजसारखीं माणसें राज्यकारभारांत

अयोग्य आहेत, ते बदलले, व कर्नेल अंडरसन साहेब पोलिटिकल एजंट झाले. त्यांजवर नामदार एलिस साहेबांनीं करसनदास यांस शिफारसपत्र दिलें. त्यांनीं त्यांस राजकोट संस्थानावर अशिष्टंट सुप्रिंटेंडेंट नेमिलें. ह्या हुद्यावर असतांना करसनदास यांनीं किटींजसाहेबांच्या ह्मणण्यांत किती असत्यता आहे, हें आपल्या करणीनें जगास स्पष्ट करून दाखविलें. त्यांच्या कारकीर्दींत शेती, कला व व्यापारास उत्तेजन मिळालें. विद्याप्रसाराकरितां मुलांच्या शाळा, पुस्तकालयें, वाचनगृहें स्थापन झालीं. औषधालयें स्थापिलीं. प्रजेच्या मालमत्तेचें व जीविताचें संरक्षण उत्तम प्रकारें होण्याकरितां जागोजाग पोलिस वगैरेचा बंदोबस्त नीट केला. समान न्याय मिळण्याकरितां सर्वत्र योग्य तजविजी केल्या. एकंदरींत रयतेच्या भौतिक व नैतिक सुधारणेस योग्य ते उपाय योजून अमलांत आणले 'विद्यागुणप्रकाशक'नांवाची तेथें एक सभा होती, पण तिचें काम मंदावलें होतें करसनदास गेल्यापासून त्यांनीं सभेंत चळवळ सुरू केली, व तेणेंकरून मंडळी जागी होऊन तिनें सभेच्या अंगें 'विज्ञानविलास' नांवाचें पत्र सुरू केलें. तें अजून चालू आहे.

करसनदास यांच्या सुस्वभावामुळें, त्यांच्या अंगच्या लीनतेमुळें, त्यांच्या गोड भाषणांमुळें ते राजकोट येथें स-

सर्वांस प्यार होऊन गेले. त्यांच्या गुणांवर लुब्ध होऊन त्यांच्या जातीच्या वाणी लोकांनीं त्यांस पंक्तिपावन केलें. येणेंकरून त्यांच्या कुटुंबास आनंद होऊन घरांतील असंतोष नाहींसा झाला.

राजकोट येथें असिस्टंट सुप्रिंटेंडन्टच्या जागेचें सुमारें अडीच वर्षें काम केल्यावर सन १८७० च्या एप्रिल महिन्यांत करसनदास यांनां लिंबडी संस्थानचे मुख्य कारभारी (अड्मिनिस्ट्रेटर) नेमिलें. त्यामुळें राजकोट सोडण्याचा प्रसंग आला. ते राजकोटाहून जातेवेळीं एकंदर प्रजेनें व नव्या मंडळीनें मानपत्रें दिलीं. व बालराजाच्या मातुश्रीनेंही त्यांच्या गुणदर्शकतेचें मानपत्र दिलें.

लिंबडीस येऊन कामाचा चार्ज घेतल्यावर करसनदास यांनीं राणीवशांतील कित्येक बखेडेखोर मंडळी दूर करून राज्यशकट सुयंत्र हांकिला, येथें असतांनां त्यांनीं एका विधवा बाईच्या लग्नाचा पुढाकार आपल्या आंगावर घेऊन तें कार्य यथास्थितपणें तडीस नेलें. त्यांनां मुळापासून मुळव्याधीचा रोग होता. परंतु चांगल्या चांगल्या औषधांनीं व नेमस्तपणाच्या वर्तनानें त्यांनीं त्याचा बीमोड केल्यासारखाच केला होता. पण त्याचा लिंबडीस असतांनां पुनः उद्भव झाला. व तो रोग जोराऊन करसनदासजीस आंथरूण ध्यावें लागलें. दिवसानुदिवस शक्ति क्षीण होत चालली. औषधोप-

चाराकरितां मुंबईहून डाक्टर पांडुरंग गेले होते, * परंतु कांहीं गुण न पडून शेवटीं त्यांतच तारीख २८ आगष्ट १८७१ इसवी रोजीं आपल्या वयाच्या एकूणचाळीसाव्या वर्षीं या महाशयानें देह ठेविला, आणि या भरतभूमीस रडावयास लावलें ! यांच्या गुणाचें वर्णन करावें तितकें थोडेंच. साधारण लोकांनीं त्यास मोठें ह्मटलें यांत नवल नाहीं, परंतु मोठ्यांनीं मोठें ह्मटलें याजवरूनच त्यांचा पराक्रम ओळखावयाचा. त्यावेळच्या मराठी, गुजराथी आदिकरून सर्व वर्तमानपत्रांतून त्यांच्या अकालीं मरणाबद्दल दुःख प्रदर्शित केलें होतें. त्यावेळच्या सुधारक मंडळीस आपला ह्मोरक्या गेला असें वाटून त्यांची घटकाभर कंबरच खचली. मुंबई सरकारानें यांच्या मरणापासून झालेला खेद पुढील ठराव सरकारी ग्याझीटांत प्रसिद्ध करून व्यक्त केला.

POLITICAL DEPARTMENT.

His Excellency the Governor in Council has received with much regret the news of the death on the 28th ultimo of Mr. Karsandas Mulji special Assistant to the Political Agent Kathiawad, in charge of the Limdi State. As a public servant Mr. Karsandas Mullji has always merited the approval of Government; and in his private capacity he has earnestly striven to promote liberal and enlightened views among his countrymen.

* हे बहुतकरून डाक्टर आत्माराम पांडुरंग असावेत

By order of the Right Honourable the Governor in Council.

(Sd.) W. Wedderburn,
Ag. Secretary to Government.

Bombay Castle,
7th September 1871.

अर्थः— **राज्यकारभाराचें खातें.**

काठेवाडच्या पोलिटिकल एजंटाचे स्पेशल आसस्टिट व लिंबडी संस्थानचे कारभारी रा. रा. करसनदास मुळजी हे गेल्या महिन्याच्या २८ व्या तारखेस निवर्तले तें वर्तमान ऐकून नामदार गव्हरनर साहेब व त्यांचे मंत्रीमंडळ यांस फार दुःख झालें आहे. सरकारचे सेवक या नात्यानें करसनदासजी यांनीं सरकारची मान्यता नेहमी संपादन केली आहे; आणि खासगी नात्यानें पाहतां त्यांनीं आपल्या देशबांधवांमध्यें उदार, उदात्त व सुसंस्कृत अशा मतांची वृद्धि करण्याविषयीं आस्थापूर्वक श्रम केले आहेत.

नामदार गव्हरनर इन् कौन्सिल यांच्या आज्ञेवरून

(सही) डब्ल्यु. वेडरबर्न
सरकारचे आक्टिंग सेक्रेटरी.

मुक्काम जंजिरे मुंबई
तारिख ७ सपटंबर
१८७१

राजाकडून असा मान मिळणें ह्मणजे असाधारणच गोष्ट समजली पाहिजे. कारण तो मान एतद्देशियां पैकीं क्वचितांच्याच वांट्यास येतो. आतां करसनदास हे महाथोर पुरुष होते, हें ह्मणजे निराळें सांगण्याचें राहिलें आहे असें नाहीं.

करसनदास यांच्या ठायीं जे अनेक सद्गुण वास करीत होते, त्यांत प्रधानत्वें स्वदेशप्रीति, उद्योगतत्परता, नीति धैर्य व प्रामाणिकपणा हे हमेष त्यांच्या वर्तनांत दृष्टोत्पत्तीस येत असत. त्यांचें यश व पराक्रम वृद्धिंगत होण्यास त्यांच्या वर्तनाचें धोरण मुख्य कारण आहे. त्यांचें असें ह्मणणें असे कीं, होतां होईल तो पर्यंत मनुष्यानें बोलण्याप्रमाणें हातानें कृति करून दाखविण्यास झटावें. मनुष्य आपला आपणच हितकर्ता व आपला आपणच शत्रू होतो. चांगल्या गोष्टीबद्दल कृतसंकल्प करून ती गोष्ट शेवटास नेण्याकरितां कायावाचामनें झटलें असतां "सत्य संकल्पाचा। दाता भगवान ॥ सर्व करी पूर्ण । मनोरथ॥" कार्य सिद्धीच्या वाटेंत हरकतींचे व संकटांचे पर्वत जरी आडवे पडले तरी निश्चयाचें बळ असल्यावर तेच दुर्गम पर्वत पायांखाली घालतां येऊन फळ हातीं करून घेतां येईल.

यांच्या गुणानुरूप स्मारकाकरितां मुंबईंत आणि काठेवांडांत वर्गणी गोळा होऊन त्या वर्गणीच्या रकमा देशांत विद्या व

नीतिप्रसाराच्या वृध्द्यर्थ ग्रंथ लिहिण्याकडे खर्च करण्यासाठीं मुंबई युनिव्हर्सीटी आणि अमदाबादची गुजराथ व्हर्न्याक्युलर सोसाइटी यांच्या स्वाधीन केल्या आहेत, व त्याप्रमाणें त्यापासून सदुपयोग होत आहे. येथें साधुकविराच्या सर्व प्रसिद्ध दोहऱ्याची आठवण होते. ते ह्मणतात, सुरतसे कीरत वडी ॥ बिन पंख उडजाय ॥ सुरततो जाती रहे ॥ कीरत कबी न जाय ॥ खरें आहे.

या शेटजींची गणना उत्तम ग्रंथकारांतही आहे. त्यांनीं केलेला 'इंग्लंडचा प्रवास' सर्व विश्रुतच आहे. 'नीतिवचन,' 'कुटुंबमित्र;' 'संसार सुख' इत्यादि लहान मोठीं यांनीं केलेलीं पुस्तकें पुष्कळ उपयोगी आहेत. 'महाराजांचा इतिहास' हेंहीं एक प्रसिद्ध पुस्तकांपैकींच आहे. शिवाय 'राजा राममोहनरायाचें' चरित्र 'इंग्रेजीवरून गुजराथींत केलेलें यांचेंच आहे असें ह्मणतात. 'स्वधर्म बोधक' आणि 'पाखंड खंडक,' व 'मुंबई बाजार' 'या नांवाचीं पत्रें तेच काढीत असत. शिवाय अनेक वर्तमानपत्रांतून व मासिक पुस्तकांतून ते लिहीत असत तें वेगळेंच. या प्रमाणें हा दीर्घोद्योगी पुरुष होता, व तो स्वपराक्रमानें यःकश्चित् मनुष्याचा सर्वमान्य जनपदहितकर्ता होऊन अखंड कीर्ति संपादून महन्मणिमालेंत विराजमान झाला.

समाप्त.